


दरवेशाच्या मस्तवाल वाघाला द्वारकामाईत श्रीबाबांच्या हस्ते मुक्ती दिली गेली. द्वारकामाईतील वाघाची प्रतिकृती या घटनेचे स्मरण करून देते.

मे १९८४ ) खास उदी विशेषांक (किंमत १ रु.

श्री साईनाथ वाचनालय

जगा लावावे सत्पथी । हीच साईलीलेची कृती ॥

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक


: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

डॉ.श्री.दि.परचुरे
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

श्री.सदानंद चेंदवणकर
( मराठी आवृत्ती )


## श्रीसाई वाक्सुधा


वर्ष ६३ वे ) किंमत १ रुपया ( अंक २

श्रीसाईलीला मे १९८४

श्रीसाई उदी महिमा विशेषांक



दूरध्वनी
८८२२५६१

: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.



वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



# श्रीसाई वाक्सुधा

"स्वस्वरूपानुसंधान" ।
हे एक भक्तीचे मुख्य लक्षण ।
म्हणती वेदशास्त्र व्युत्पन्न ।
ज्ञानसंपन्न आचार्य ॥८७॥
पूजादिकीं प्रेमव्यक्ति ।
अर्चन भक्तीची हे रीती ।
ऐशी पाराशर व्यासोक्ती ।
भक्ति म्हणती ती एक ॥८८॥
गुरुप्रीत्यर्थ उपवन ।
पारिजातादि पुष्पावचय जाण ।
गोमय-सडा-संमार्जन ।
गुर्वंगण झाडावे ॥८९॥
प्रथम स्नान संध्या करणें ।
गुरुदेवार्थ गंध उगाळणें ।
पंचामृत स्नान घालणें ।
धूपदीपार्चनेंसी ॥९०॥
तदुपरी नैवेद्य समर्पणें ।
आरती धूपारती करणें ।
ऐसे जें सप्रेम घडणें ।
'अर्चन' नांव या सकळां ॥९१॥
– श्री साईसच्चरित् अध्याय १

# सुविचार

ईशावास्यमिदं सर्वं
यत् किं च जगत्यां जगत् ।
तेन त्यक्तेन भुञ्जीथाः
मा गृधः कस्य स्विद् धनम्
–ईशावास्योपनिषद–१.


या जगती तलावर जे जे काहीं आहे ते सारेच गतिमान आणि सर्वच ईश्वराने व्यापलेले आहे. त्याने दिलेले जे असेल ; तेवढ्यानेच तू उपभोग घे. कुणाच्याही धनाचा तू लोभ धरू नकोस.

★

# अनुक्रमणिका मे १९८४

(१) संपादकीय – श्रीबाबांची भेट – उदी
(२) श्री. चंद्रकांत गरगटे
(३) श्री. पु. कृ. धुपकर
(४) श्री. अरविंद मजली
(५) विजया पाटील
(६) श्री. सतीश रेगे
(७) सौ. विनोदिनी राजपूत
(८) श्री: राजेंद्र कदम
(९) श्रीमती इंदुमति चौबळ
(१०) श्री. सच्चिदानंद रोडे
(११) सौ. निर्मला मालवणकर
(१२) श्री. जगदीश शेलटकर
(१३) सौ. आसावरी वायकूळ
(१४) सरदार सी. एन. साठे
(१५) सौ. वर्षा हजारे
(१६) श्री. विलास सावंत
(१७) कु. शुभांगी पावसकर
(१८) श्री. पुंडलिक सोनावणे
(१९) सौ. कुमुदिनी टिळक
(२०) श्री. नारायण चोरगे
(२१) सौ. उषाताई मुळे
(२२) सौ. मालती रेगे
(२३) श्री. अवधूत पोतदार
(२४) सौ. सु. र. हटाळकर
(२५) श्री. डी. एन्. कुलकर्णी
(२६) सौ. शिलाबेन पाटील
(२७) श्री. देवेंद्रसिंह जमादार
(२८) सौ. हिराबाई अनारडी
(२९) श्री. किरणकुमार नाईक
(३०) प्रतिभा शर्मा
(३१) श्री. ग. स. परब
(३२) श्रीमती अनसूया सुबालकर
(३३) श्री. भिकाजी महाडिक
(३४) सौ. अनिता आजगावकर
(३५) संजय कुंभार
(३६) श्रीमती सुमित्रा पाटणकर
(३७) श्री. सत्यवान गायकवाड
(३८) मृदुला आंब्रे
(३९) सौ. रत्ना पवार
(४०) सौ. ज्योती जोशी

# श्रीसाईबाबांची साक्षात् भेट–उदी




सत्य हे कल्पिताहून अद्भूत असते असे म्हणतात पण आमची तर पक्की खात्री आहे की वरील म्हणीपेक्षाही श्रीसाईची शक्ती ही फार महान जबरदस्त अशी शक्ती आहे. या शक्तीने सारे चराचर व्यापून टाकलेले आहे. श्री साईबाबांचे भजन, भक्ती, नामस्मरण, मूर्तीचे वा तसबिरीचे दर्शन व श्रीसाई उदीचे लेपन यात खरोखरीच दिव्य शक्ती आहे. शिरडीची यात्रा भक्त करतात ते केवळ नयनरम्य श्री बाबांच्या मूर्तीचे, समाधी स्थानाचे दर्शन घेण्यासाठी व येताना बाबांच्या साक्षात भेटीची म्हणजे उदीची. आपल्याबरोबर उदी ते घेऊन येतात व दररोज नित्य नेमाने ती लावतात, किंचित तोंडातही टाकतात अमृततुल्य ती आहे म्हणून जीभेवर ती लावतात.

श्री बाबांची उदी म्हणजे अंगारा – राख ही धुनीमाई पासून प्रसवलेली आहे व आजही प्रसवत आहे व तो अखंड तेथूनच प्रसवत रहाणार आहे. श्री. बाबांच्या कारकिर्दीत व त्यांच्या पश्चात ती गोणीच्या गोणी, पोतीच्या पोती लोकांस – भक्तांस पुरविली गेली होती व पुरविली जात आहे. ही धुनी श्रींनी स्वतः आपल्याजवळ असलेला चिमटा जमिनीवर आपटून योग सामर्थ्याने प्रज्वलीत केली व ती सुमारे ७०–७२ वर्षापूर्वी केली व त्यावेळेपासून ती सतत पेटत आहे. धुमसत आहे. ही धुनी जिथे प्रज्वलीत केली त्या स्थानाला बाबांनी 'द्वारकामाई' असे संबोधले. ही द्वारकामाई म्हणजे बाबा तिथे येण्यापूर्वी शिरडी गावातील मोडकी–तोडकी जीर्णावस्थेत असलेली मशीद होय.

बाबा या मशिदीत रहावयास आल्यावर दिवसा ते इकडे तिकडे जात पण रात्री द्वारकामाईतच राहात. कुणी नेले तर मग जात. लोकांना औषधोपचार सांगत, करत व देत रोग्यांची सेवा–सुश्रुषा ते करीत दीन दुःखीतांच्या उपयोगी ते पडत. पण त्याबद्दल त्यांनी कुणाकडूनही एक छदाम, देखील घेतला नाहीं,

कित्येक प्रसंगी तर रोग्यांची सेवा सुश्रुषा योग्य प्रकारे होत नसली तर स्वतः जाऊन ते तिथे त्याची सेवा करीत. पुढे पुढे त्यांनी औषधपाणी देण्याचे बंद केले व आपल्या धुनीतील उदी–अंगारा ते देऊ लागले. एकदा बाबा काका दीक्षितांना म्हणाले, "काका पूर्वी मी लोकांना औषध देत असे. पुढे औषध देणे सोडले आणि हरी हरी करू लागलो आणि हरी हरी करता–करता हरी भेटला."

बाबा स्वतः धुनीमाई साठी दूर दूर जाऊन जंगलातून मोठमोठी लाकडं आणत व ती धुनीत टाकून त्या लाकडांची झालेरी राख – अंगारा– उदी सर्वांस देत व कपाळास दोन भुवयांच्या मधोमध (१७ वी कला) जोराने लावीत असत.

ही बाबांची उदी आपणास काय सांगते व काय शिकवते?

तर देह हा पंच महाभूतांचे काष्ट आहे!

देहही पंचभूतांचे काष्ट । भोग भोगावया अवशिष्ट ।
भोग सरता पडेल निश्चेष्ट । होईल विस्पष्ट ही राख ।।

या मानवां! देहाची अशीच राख होणार आहे तरी सावध रहा. महामाया, माया, आदिमाया यांच्या काटेरी कुंपणाने हे विश्व चोहोबाजूंनी वेष्टिलेले आहे. ब्रम्हसत्य, ब्रम्हांड अनृत याची जाणीव ही उदी देत असते.

शिरडीतील धुनीमाई मध्ये बाबांनी आत्म परमात्म तत्त्व ओतून गोर गरीब दुःखी–कष्टी सर्व जीवांकरिता त्यांच्या जीवनाकरिता अखंड प्रज्वलीत करून ठेवलेला हा अग्नी व त्यामधून बाहेर येणारी उदी म्हणजेच आज बाबांनी आपल्या भक्तांसाठी प्रत्यक्ष दिलेली भेट व आशीर्वाद होय असेच म्हटले पाहिजे.

मनुष्य देही ब्रम्हप्राप्ती । ते देहभाव नसावा चित्ती ।
विदेहत्वे परमार्थ गती । विवेक मद्युक्ति निज पुरुषार्थ ।
वरदेहा ऐसे गोमटे । शोधितां त्रैलोक्य न भेटे ।
आणि देहा ऐसे बोखटे । अत्यंत खोटे आन नाहीं ।।
बोखटे म्हणून न त्यागावे । तरी मोक्ष सुखा नागवावें ।
गोमटे म्हणून भोगावे । ते अवश्य जावे अधःपाता ।।
हे भोगावे न त्यागावे । निज पुरुषार्थं लागावे ।
भगवन्मार्गी लावावे । तरीच सुखा ।।

ही जीवनमुक्ती स्थिती संपादणे हेच जीवित साफल्य आहे आणि ही अवस्था देहाला प्राप्त झाल्यावर विश्वचैतन्यामध्ये आत्मचैतन्याची ज्योत मिळून जावी म्हणजे सर्व भेदभाव नष्ट होतो.

बाबांची उदी म्हणजे दुसरे तिसरे काही नसून या कलीयुगातले कुठल्याही साध्य असाध्य रोगराईवरचे जालीम औषध आहे असेच म्हटले पाहिजे.

श्री साईबाबांच्या या उदीची प्रचिती लाखो लाखो भक्तांना आजवर आलेली आहे. बाबांच्या या असामान्य भेटीबद्दलचे आपापले अनुभव भक्तांनी पाठविले त्यातून काहीं निवडक अनुभव वेचून ते या खास उदी अंकात समाविष्ट केले आहेत. बाबांच्या मौलिक भेटी बद्दलच्या उदीवर काही चांगल्या कविता पण येथे देत आहोत. आमच्या वाचकांना हा उदी अंक वाचनीय व संग्राह्य वाटेल अशी अपेक्षा करावयास हरकत नाहीं.

जयसाईराम्

---

श्री साईलीलाचे यंदाच्या वर्षातील

तीन खास अंक

**गुरुपौर्णिमा विशेषांक**

ता. १ जुलै १९८४ रोजी प्रकाशित होईल

**विजयादशमी विशेषांक**

ता. १ ऑक्टोबर १९८४ रोजी प्रकाशित होईल

**दिवाळी अंक**

ता. १ नोव्हेंबर १९८४ रोजी प्रकाशित होईल

# उदी दिव्यत्वाची शक्ती

–श्री. चंद्रकांत श्रीराम गरगटे
३९९, गुरुवार पेठ,
सातारा – ४१५ ००२.

० उदी ही दिव्यत्वाची शक्ती आहे. उदीमध्ये इतके दिव्य सामर्थ्य आहे की, असाध्य गोष्ट साध्य करणारी ती संजीवनी आहे.

उदीला कोणी अंगारा म्हणून संबोधतात तर कोणी भस्म समजतात तर कोणी बिभूती म्हणून, तर कोणी राख समजतात.

संसार हा उदीसमान आहे. मानवी देह हा नश्वर आहे. देहाचे पतन झाल्यानंतर त्याची राख बनते. हे मर्म लोकांच्या लक्षात यावे म्हणूनच श्री साईबाबांनी लोकांना उदी औषध म्हणून देण्यास सुरुवात केली. बाबांच्या दर्शनास जे जे लोक शिरडीस जात असत त्यांना साईबाबा प्रसाद म्हणून उदीच देत असत.

साईबाबा हे शिरडी येथील एका लिंबाच्या झाडाखाली इ. स. १८३८ मध्ये बालरूपात प्रगट झाले. भारत भूमीचा उद्धार करण्याकरिता त्यांनी आपला देह झिजविला. आपल्या अमृतवाणी मधून लोकांना भक्तीमार्ग शिकविला. दि. १५ आक्टोबर १९१८ रोजी त्यांनी आपले अवतारकार्य संपविले.

साईबाबा आज जरी हयात नसले तरी त्यांची आठवण म्हणून उदी आज महान कार्य करीत आहे. साईबाबा हयात असतांना त्यांनी आपल्या पवित्र हातांनी धुनी पेटविली होती. ती पवित्र धुनी आजही रात्रंदिवस आपणांस पेटलेली दिसते. शिरडीमध्ये हजारो लोक (भक्त) येतात व जातात. जातांना सर्वजण आपल्याबरोबर उदी घेऊन जातात. तरीपण उदी कधी कमी झालेली नाहीं अथवा उदीमधील दिव्यत्वाची, सामर्थ्याची शक्ती कमी झालेली नाही. भक्तांची दुःखे, संकटे, अडचणी सर्व कांही नष्ट करून लोकांना सुख समृद्धीचे जीवन देणारी उदी ही अलौकिक, चिरंतन लाभलेली महान अशी दिव्यत्वाची शक्ती आहे.

एकदा एका सावकाराने एका गरीब बाईचे शेत कर्जापोटी गडप केले. त्या बाईने त्या सावकाराकडून थोडेसेच कर्ज घेतले होते. परंतु त्या बाईचे मोठे शेत

सावकाराने आपल्या ताब्यात घेतले. ही घटना सर्वत्र समजली. त्या बाईंच्या घराशेजारी काही न्यायासाठी झटणारी मंडळी रहात होती. त्या लोकांना बाईंची कीव आली. तिच्या बद्दल दया-सहानुभूती निर्माण झाली. त्या बाईंना त्यांनी सावकारा विरुद्ध खटला भरण्यास सांगितले. त्या प्रमाणे खटला भरला. परंतु कोर्टात देखील त्या बाईंची फजिती होऊ लागली. तेव्हां त्या बाईंना कोणा एका व्यक्तीने सांगितले की, तू शिरडीस जा व श्री साईबाबांचे दर्शन घेऊन ये म्हणजे सर्व काही ठीक होईल.

त्याप्रमाणे त्या बाई शिरडीस गेल्या. श्री साईबाबांचे दर्शन घेतले. त्यानंतर श्री साईबाबांनी त्या बाईंना उदी-प्रसाद दिला. रोज सकाळी स्नान केल्यानंतर उदी कपाळास लावण्यास सांगितले. तशा प्रकारे त्या बाईंचा नित्यनेम चालू झाला. त्या बाई रोज श्री साईबाबांचे ध्यान करीत असत. हा त्यांचा नित्य-नेम चालू असतांनाच कोर्टातील तारखेचा दिवस उजाडला. त्या बाई कोर्टात गेल्या. कोर्टातील न्यायमूर्तींनी त्या बाईंच्या बाजूने न्याय मिळवून दिला, व तिचे शेत तिला परत मिळवून दिले.

श्री साईबाबा हयात असताना जे काहीं भक्त शिरडीला दर्शनार्थ जात असत. त्यांच्या मनातील हेतू साईबाबा अंतर्ज्ञानाने ओळखत असत. त्याप्रमाणे त्या भक्तांची कामना फलद्रुप होत असे, पूर्ण होत असे. श्री साईबाबा त्या भक्तांना प्रसाद म्हणून उदी देत असत.

श्री साईबाबांचा कृपाहस्त सतत भक्ताच्या पाठीशी आहे त्याप्रमाणे उदीमध्ये त्यांच्या कृपेची दिव्य शक्ति आहे.

श्री साईबाबांनी आपल्या भक्तांना श्रद्धा व सबुरीची महान शिकवण दिली. साईबाबांची उदी जर भक्तीभावाने, श्रद्धेने भक्ताने कपाळी लावली तर त्याचे इच्छित पूर्ण झाल्याशिवाय रहात नाहीं.

श्री साईबाबांची उदी ही दिव्यत्वाची शक्ती आहे, परंतु साईबाबांचा कृपा-हस्त आशिर्वाद अक्षय व चिरंतन असा आहे.

श्री साईबाबांची लीला अगाध आहे. त्यांच्यापुढे जो भक्त नतमस्तक होतो, त्या भक्ताचा दृढ आणि भक्कम आधार तेच आहेत. श्री साईबाबांच्या कृपेचा वरदहस्त सदैव भक्ताच्या पाठीशी राहो हीच श्री साईचरणी प्रार्थना! ★

# मानव धर्म हाच समता धर्म

—श्री. पु. कृ. घुपकर.
२१७–६, जवाहर नगर,
गोरेगाव, मुंबई ४०० ०६२

० वैदिक धर्माच्या नावाखाली जपजाप्य, व्रतवैकल्य, होमहवन वगैरे बाह्य विधींना विशेष महत्त्व अखिल भारतात दिले जात होते. खऱ्या सनातन धर्माच्या सत्य तत्त्वांचा गुंडाळा करून ठेवला गेला होता, त्यामुळे हिंदुधर्म व त्यातील बहुमोल अशी श्रेष्ठ तत्त्वे सामान्य जनांपर्यंत पोचू शकली नव्हती. अर्थात वर्णाश्रम धर्माची कृत्रिमता वाढीला लागली होती. अशावेळी धर्म रक्षणासाठी याच महाराष्ट्रातील संतांनी उघड उघड धार्मिक बंड उभारले व भागवत धर्माची द्वारे सर्व समाजासाठी सताड उघडी ठेवण्याचे महान कार्य केले. श्री नामदेव महाराज व श्री ज्ञानेश्वर महाराज ह्यांच्या समकाळांतील सर्व समाजातील अनेक स्त्रीपुरुष संतांनी समताधर्म व मानवधर्म प्रत्यक्ष कृतीने वाढविला. त्यांच्याकाळी महाराष्ट्राच्या दुर्भाग्याने मुसलमानी राज्य आले होते. राज्यकर्ते राज्यप्रसाराच्या बरोबरीनेच धर्म प्रसाराचे कार्य ह्या त्या प्रकारांनी करीत होते.

अशा परिस्थितीत धर्माच्या नावांवर कृत्रिम उच्चनीच भाव निर्माण करणारे रूढी परंपरागत भेदभाव हिंदुसमाज व हिंदुधर्म ह्यांच्या ऱ्हासास कारणीभूत होत होते.

अशा काळात हिंदुसमाजाच्या ऐक्यासाठी श्री एकनाथ महाराजांनी महान धारिष्टय दाखविले. पैठण येथे प्रत्यक्ष महारवाड्यात जाऊन राणु महाराच्या घरात बसून त्यांनी राजरोसपणे अन्नग्रहण केले. संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी तर आपल्या अभंगवाणीने महाराष्ट्रातील शहरे, गाव, खेडी इतकेच नव्हे तर ज्या ज्या ठिकाणी मनुष्यवस्ती आहे अशा दऱ्याखोरी सुद्धा भक्ति व समभाव ह्याच्या प्रभावाने हलवून सोडली होती. महाराष्ट्रीय संतांचे धर्म प्रसाराचे व राष्ट्रोद्धाराचे कार्य तेराव्या शतकापासून ते सतराव्या शतकापर्यंत अव्याहत चालू होते. परकीय मुसलमानी राज्यकर्त्यांनी शेकडो वर्षे भारतावर सत्ता गाजविली. हिंदुस्थानचा काना-कोपरा सुद्धा त्यांनी आपल्या आसुरी लालसेने व्यापून टाकला. धर्मांतर व राजकीय सत्ता ह्या दुधारी कात्रीत भारताचे भवितव्य सापडले होते. राक्षसी

वृत्तीच्या जुलूमामुळे त्या सत्तेने भारताची जणू कंबरच मोडली होती. जुलूम करणे हा जणू जन्मसिद्ध हक्कच! असल्या बेफाम वागणुकीमुळे त्या सत्तेने हिंदुधर्म व हिंदुसमाज ह्यांना त्राही भगवान करून सोडले होते.

अशावेळी श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदुस्थानचे स्वातंत्र्य व हिंदुधर्म ह्याच्यासाठी स्वराज्याचे आवाहन केले. महाराष्ट्राच्या पुण्यभुमीत श्री समर्थ रामदासांनी "जयजय रघुवीर समर्थ" ह्या धर्म गर्जनेने रामभक्तीचा प्रसार सर्वत्र केला. भारतातील इतर कोणत्याही प्रांतास जे शक्य झाले नाहीं ते एक महाराष्ट्राने केले. अशा ह्या महाराष्ट्रात साईबाबा आले. कारण महाराष्ट्र ही संतांची समताभूमी, योग्यांची कर्मभूमी व वीरांची रणभूमी आहे. महाराष्ट्राच्या इतिहासांत नगर जिल्हयास अनेक दृष्टीने महत्त्व आहे. वेदान्त तत्त्वज्ञान संस्कृत भाषारूपी किल्ल्यांत अडकून पडले होते. अशावेळी श्री ज्ञानेश्वर महाराजांनी ते उघड्यावर ओढून आणले व मराठी भाषेच्या लोकांनी शोभविले.

केवळ जनहितासाठी ते चव्हाटयावर मांडले आणि त्याच्याद्वारे जातपातीच्या व उच्चनीचतेचा कृत्रिम भेदभाव गाडून टाकण्याचे महत्त्वाचे कार्य केले. परमेश्वर-प्राप्तीचा दैवी हक्क सर्व मनुष्य प्राण्यास सारखाच आहे, त्यात उच्चनीचतेचा कृत्रिम भेदभाव मुळीच आडवा येत नाहीं. इतकेच नव्हे तर स्त्री–पुरुष असा फरकही परमेश्वर प्राप्तीच्या हक्कात मानला जात नाहीं. ह्या बाबांच्या श्रेष्ठ मानवता धर्माची सुरवात श्री ज्ञानेश्वर महाराजांनी नेवासे गावी "श्री ज्ञानेश्वरी" हा ग्रंथ लिहून केली. महान योगी चांगदेव महाराज ह्यांचे समाधिस्थान पुणतांबे येथे आणि पौराणिक कालातील ऋषीच्याही समाधि कोपरगांव येथे शिरडी ह्या गावाजवळ आहेत. ह्या खेरीज नाथ पंथातील सुप्रसिद्ध अशा अनेक योग्यांची समाधिस्थाने ह्या जिल्हयांत बरीच आहेत.

श्री साईबाबांनी अखिल भारतातील लाखो खेडी सोडली व शिरडी येथे येऊन आपले अवतार कार्य पूर्ण केले, ह्या महत्त्वाच्या गोष्टीच्या मुळाशी त्यांचे निश्चित असे ध्येय होते. महाराष्ट्रात त्यांचे मुख्य ध्येय म्हणजे अधर्मरूपी राक्षसाचा नायनाट करून समाजात ऐक्य, न्याय, नीती, मानवता धर्म व सर्वत्र समभाव ह्यांचा प्रसार करणे, ह्या ध्येयासाठीच ते ह्या भागात येणे शक्य आहे. साधेभोळे भाविक शेतकरी, सोनार, शिंपी, भिल्ल अस्पृश्य आदि सर्व खेडूत हेच बाबांचे आरंभीचे भक्त! श्रीसाईबाबांचे वाढते वैराग्य, चेहऱ्यावरील अप्रतीम दैवी तेज व परमेश्वरावरील अढळ निष्ठा ह्यांमुळे ते दिवसेंदिवस अधिकाधिक लोकप्रिय

होऊ लागले. आलेल्या भक्ताकडे श्रीबाबा नुसते पहात, कोणाशीही विशेष बोलत नसत. ते स्वतःच्या इच्छेनुसार वागत. परंतु सर्व प्राणीमात्राकडे सम भावनेने पाहात. साखर काहीं मुंग्यांना आमंत्रण देत नाहीं, त्याच तिच्यासाठी हवे ते कष्ट सोसून जातात. श्री बाबांची वाढती तपश्चर्या पाहून त्या अडचणीच्या स्थानी देखील लोकांची विशेष गर्दी होऊ लागली.

श्री बाबांच्या प्रसिद्धिकाळांत एक मुंबईकडील गृहस्थ दर्शनास आले. त्यांनी भक्तीभावाने बाबांच्या चरणी मस्तक ठेवले. श्रीबाबांनी त्यांच्या कपाळाला उदी लावून डोक्यावर वरदहस्त ठेवला. ह्यामुळे त्या गृहस्थास अत्यानंद झाला. इतक्यात त्याच्या संबंधी चर्चा सुरू झाली. त्या गृहस्थाची पांचावर धारण बसली. कारण तो जातीने चांभार होता. त्याकाळी खेड्यांतील स्पृश्यांच्या अस्पृश्यांबद्दलच्या भावना फारच विचित्र होत्या. चांभाराने द्वारकामाईत जाऊन श्री बाबांचे दर्शन घ्यावे हे त्याने केलेले महापाप आहे. असे कर्मठ बोलू लागले. त्याबाबत श्रीबाबांकडे तक्रारही करण्यांत आली. श्रीबाबांनी त्या चांभार गृहस्थास द्वारकामाईत परत बोलावले. व इतर मंडळींस सांगितले की, देवाच्या दरबारांत भेदाभेद मानणे हेच महापाप आहे. देवाचे नांव घेण्यास व त्याच्या मंदिरांत जाण्याचा प्रत्येक मनुष्यास हक्क आहे. अवघी त्याची लेकरे आहेत. मनुष्याने धर्माचे बाबतीत भेदाभेद ठेऊन वागावे हे देवास कधीही मान्य होणार नाहीं. ह्या गृहस्थाने द्वारकामाईत येऊन दर्शन घेतले ह्यांत त्याचे काहींही चुकले नाहीं. ह्या विषयावर श्री बाबा तासभर बोलत राहिले. समाजांत समभाव निर्माण करण्यासाठी अधिकार वाणीने असा उपदेश करीत. श्री बाबांस अवतार मानून त्यांच्यावर पूर्ण श्रद्धा ठेवणारे अनेक उच्चवर्णिय ब्राम्हण शिरडी येथे होते. अशा सर्व भक्तांस ते द्वारकामाईत एकाच पंक्तीस बसवित. दुपारच्या आरतीच्या वेळी नैवेद्य म्हणून अनेक जातीच्या लोकांकडून ताटे येत ताटांतील पोळ्या श्री बाबा स्वहस्ते एकत्र करीत व त्या बडेबाबा ह्या फकीराला कुसकरण्यास सांगत. व नंतर स्वहस्ते त्या सर्वांस वाढीत. सर्वजण बाबांच्या हातचा प्रसाद आनंदाने व प्रेमाने खात. "हे देवाचे स्थान आहे" येथे भेदाभेद, स्पृश्य, अस्पृश्य असे मानू नये. देवापाशी सर्व सारखेच असतात.

श्री बाबांची आरती द्वारकामाईत रोज दुपारी होत असे. आरतीच्यावेळी, ब्राम्हण व इतर काहीं सुशिक्षित स्त्रिया सरळ द्वारकामाईत जात. एका प्रसंगी व्यवस्थित कपडे केलेली एक बाई सभा मंडपाचे दाराशी उभी होती. ती खरगपूर येथून मुद्दाम श्री बाबांच्या दर्शनाला आली होती. ती जातीने महारीण असल्यामु

मुद्दाम बाहेर उभी होती. तिची अंतःकरणपूर्वक अशी इच्छा होती की, प्रत्यक्ष बाबांचे पाय धरावे. परंतु रूढीची लोहशृंखला मनांत आडवी येत होती. त्यामुळे ती दुःखी मनाने दुरून सर्व पहात होती. श्रीबाबांना सर्वांच्या मनातले समजत होते. कोण कशा बुद्धीने आपल्या दर्शनास येतो! हे जाणून श्री. बाबांनी डॉ. पिल्ले ह्यांना आज्ञा केली की, त्या बाईस द्वारकामाईत घेऊन या. ती बाई द्वारकामाईत आली. तिने श्री बाबांच्या चरणावर मस्तक ठेवले व तिच्या डोळ्यांतील आनंदाश्रूनी श्री बाबांचे चरण भिजले. तिला खूप आनंद झाला. नंतर श्री बाबांनी तिला इतर बायांत थांबण्यास सांगितले. आरती आटोपल्यावर ही परिस्थिती कै. जोगांना कळली. ह्याबाबत त्यांनी श्री बाबांस विचारले. श्री बाबांनी उभ्या असलेल्या बायांकडे हात करून एकाच वाक्यात सांगितले "ह्या बायांत व ह्या महार बाईत काय फरक आहे तो फक्त सांगा, कै. जोग पुढे काहींच बोलले नाहींत. भजन म्हणून पोट भरणारे चार महार एकदा द्वारकामाईत आले. भजनासाठी त्यांनी परवानगी मागितली. श्री बाबांनी समोरच्या भिंतीपाशी बसा व तुमचे भजन चालू द्या. भजना नंतर श्रीबाबांनी कै. केळकरांना आज्ञा केली की, ह्यांना प्रत्येकी चार वार कपडा द्या. कै. केळकरांनी कपडा आणला व तो त्या महाराच्या अंगावर दुरूनच फेकला. हे पाहतांच श्रीबाबा जागेवरून उठले त्यांनी कै. केळकरांचा हात आपल्या हातांत धरून तोच कपडा त्यांच्या हाताने त्या महारांच्या अंगावर घातला व ते म्हणाले "हरी भजन करणारे असूनही तुम्ही विटाळ धरतां? प्रत्येक मनुष्य प्राण्यास जन्म देणारा एकच परमेश्वर! सर्व त्याचीच लेकरे आहेत. आपण अशा भेदभावाने वागलो तर ते परमेश्वरांस आवडेल काय?" वरील दोन्ही घटना घडल्या त्यावेळी श्री सगुणराव मेरू नाईक हजर होते श्री बाबांनी कोणालाही दर्शनास मनाई केली नाहीं त्यांचे जवळ कुठलाच भेदभाव नव्हता सर्वांचा आत्मा एकच आहे सर्व जग परमेश्वराचे आहे तुम्ही आज आहांत उद्या नाहीं. कोणाचेही मन दुखवू नये. कोणीही नीच नाहीं जो तो आपल्या पूर्व कर्मांची फळे भोगतो. आपणच ह्या जाती निर्माण केल्या आहेत. त्यात गुरफटून न राहता नामस्मरण करावे व जन्माचे सार्थक करून घ्यावे. हा श्री बाबांचा उपदेश आपण किती आचरणांत आणतो आहोत?

# साईकृपा जयावरी देव तयाचा कैवारी

—श्री. अरविंद न. मजली. बी. कॉम., बी. एड.
सभासद ओम श्री साईसमाज,
टिळकवाडी, बेळगाव, ५९० ००६.

० मी व्यवसायाने एक शिक्षक असून गेली ४० वर्षे साई सेवा मनोभावे करीत आहे. माझे परमपूज्य वडील कै. नरहर विष्णू मजली हे पण परमभक्त होते व आपल्या निधनाच्या दिवसांपर्यंत ते साई मंदिरात जाऊन परमप्रिय बाबांचे दर्शन व उदीप्रसाद सेवन करीत. मी साई मंदिर विश्वस्थ सस्थेचा एक सभासद आहे. व मंदिराच्या कार्यात सक्रिय सहभाग घेत असतो. मला श्री साईबाबांचा प्रेमळ अनुभव नुकताच आला व बाबांच्या प्रेमळ कृपाप्रसादाने एका मोठ्या संकटातून बचावलो.

बुधवार तारीख ८–२–१९८४ रोजी नेहमीप्रमाणे शाळा आटोपून मी घरी येत होतो. वेळ साधारण ५ च्या सुमाराची होती. शांतचित्ताने व डाव्या बाजूने सावकाश सायकल चालवित येत होतो. त्याचवेळी पाठीमागून येणाऱ्या सिटी बसने जोरात ठोकर दिली. एकक्षणभर काय झाले कळलेच नाहीं. सायकलच्या पुढच्या चाकाला ठोकर बसल्यामुळे डावा पाय जवळजवळ लोंबू लागला व बघता बघता शुद्धी हरपू लागली तोंडाने साईनामाचा उच्चार करीत पडलो. बघता बघता भोवती गर्दी जमली. त्यातले एक सज्जन मित्र श्री. दाते वकील यांना माझी ओळख लागली, व त्यांनी सर्व सूत्रे आपल्या हातात घेतली, व एका रिक्षात घालून अस्थितज्ञ डॉ. छब्यांच्या हॉस्पिटलमध्ये नेले. प्रश्न होता मार कुठे लागला आहे याचा थोड्याशा शुद्धीत व थोड्या बेशुद्धावस्थेत लक्षात आले की माझी बायको व मुलगी चि. अपर्णा साईबाबांची उदी सर्वत्र लावत आहेत. डॉक्टरांनी संपूर्ण तपासले व मोठ्या आनंदाने सांगितले की फक्त डाव्या पायाचे हाड मोडले आहे व बाकी सर्व सुरक्षित आहे. त्याच रात्री प्लॅस्टर घालण्यात आले. दुसऱ्या दिवशी मंदिरातील व्यवस्थापक श्री. बाबा नाडकर्णी व माझे मित्र गजानन शेट्टी धावून आले. साईबाबांचा प्रसाद, उदी व प्रार्थना म्हणून मला धीर दिला व दोन दिवसांत डिसचार्ज मिळाला.

तरीपण मला अनेकदा अनुभव आला. आपल्या प्लॅस्टर केलेल्या पायावर कोणीतरी प्रेमाने हात फिरवित आहे असा भास झाला. ही सारी बाबांची महिमा. बाबा आपल्या भक्तांच्या संकटकाळी धावून येतात. त्यांचे संकट निवारण करतात. प्रत्यक्ष जीवावर बेतलेले संकट फक्त पायांवर निभावावे यालाच म्हणावे प्रचिती. **"जरी हे शरिर गेलो मी टाकून तरी मी धावेन भक्तांसाठी"** देवा प्रभो साईबाबा अखंड असावा व तुझ्या सेवेचा व वृद्ध मातोश्रीची सेवा करण्याची अखंड संधी मिळावी हीच साई चरणी प्रार्थना!

# श्रीसाईबाबांच्या करुणेचा एक अथांग अनुभव

**—विजया पाटील**
२०३ लक्ष्मी निवास,
शिवाजी पार्क, रस्ता नं. ५
मुंबई – ४०० ०१६.

**"जरी हे शरीर गेलो मी टाकून ।। तरी मी धावेन भक्तांसाठी ।।**
**"नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य ।। नित्य घ्या प्रचीत अनुभवे ।।**

हे श्रीसाईनाथांचे शब्द अक्षरशः खरे झालेले आपल्याला दिसून येतात. आज जगाच्या सव कानाकोपऱ्यात श्रीसाईंचे भक्त पसरले आहेत; आणि त्या सर्वांना श्रीसाईबाबांच्या वचनांची प्रचिती आलेली आहे. श्रीसाईंची मनोभावे प्रार्थना केल्यावर, त्यांची करुणा भाकताच श्रीसाई सर्वांचे दुःख दूर करतात. आम्हांलाही श्रीसाईंच्या अथांग करुणेचा असाच अनुभव आला.

गेल्या वर्षीच्या श्रावणातली गोष्ट. धुवांधार पाऊस पडत होता. श्रावण संपायला १०–१२ च दिवस राहिले होते. त्यानंतर येणार होता भाद्रपद. श्री गणेशाचे आगमन होणार होते. आमच्या घरातही श्रीगणेशाचे मंगल आगमन होणार होते. आम्ही सर्व त्या तयारीत होतो. असे असतानाच एक दिवस माझ्या आईला अचानक थंडी वाजून ताप भरला. जोराची सर्दी झाली. छातीमध्ये कफ भरला. प्रथम घरगुती उपचार करुन पाहिले पण थंडी व ताप कमी होईना

तेव्हां आईला डॉक्टरचे औषध सुरू केले आमच्या फॅमिली डॉक्टरांनी आईला स्ट्रॉन्ग अँटीबायोटिक्सच्या गोळ्या वगैरे देऊन दोन दिवसात बरे केले त्या गोळ्यांनी आईचा ताप व थंडी वाजण या गोष्टी दूर झाल्या परंतु तिला फार अश तपणा आला; आणि त्यातून तिला मूळव्याधीसारखी दुर्धर व्याधी जडली. फार वेदना होऊ लागल्या. रक्त पडू लागले. पोटात अन्न जाईना व त्यामुळे फार अशक्तपणा आला. आमच्या घरातील श्रीगणेशांचा उत्सव त्यातच पार पडला. आईच्या दुखण्याने जोर केला. तिच्या वेदना, दुःख पाहवत नव्हते. डॉक्टरना दाखवले होते. त्यांच्या गोळ्या व औषधे चालू होती पण काहीच गुण येत नव्हता. मूळव्याधीवरील माहीत असलेले, लोकांनी सांगितलेले सर्व उपचार आम्ही करत होतो. त्याचबरोबर श्रीसाईंची दिव्य उदी देखील माझी आई प्राशन करीत होती. परंतु त्या कशाचाच उपयोग होत नव्हता. शेवटी डॉक्टरांनी ऑपरेशन करावे लागेल असे सांगितले. परंतु ऑपरेशनची सर्वांना भिती वाटत होती. ऑपरेशनशिवाय ही दुर्धर व्याधी बरी कशी होईल याचीच सर्वांना चिंता होती. यातच दोन–अडीच महिने निघून गेले. आईच्या वेदना दिवसेंदिवस वाढतच होत्या व त्या माझ्याने पहावत नव्हत्या. अखेर एक दिवस संध्याकाळी श्रीसाईंच्या फोटोसमोर मी उभी राहिले. त्यांना हात जोडले व श्रीसाईनाथांची कळकळून प्रार्थना केली. "साईबाबा, माझ्या आईला त्वरीत बरे वाटू दे. तिच्या वेदना, दुःख सर्व नाहींसे होऊ दे. आता आम्हां कुणालाच तिचे हे दुःख पहावत नाहीं. तिची तुम्हाला दया येऊ दे. तुमच्याशिवाय आता आम्हाला कोणाचा आधार? तुम्हीच आता आमचे सर्व काहीं! माझ्या आईवर कृपा करा. जर आईला बरे वाटले तर मी तो अनुभव साईलीलेमध्ये देईन', या कळवळून केलेल्या प्रार्थने-बरोबरच श्रीसाईंची उदी देखील घेतली जात होती.

त्याचबरोबर एका चांगल्या नाणावलेल्या डॉक्टरांची आम्ही आईसाठी अपॉइंटमेंट घेतली. त्यांनी आइला तपासून औषध सुरू केले. त्या औषधांनी माझ्या आईला हळू हळू आराम पडू लागला. तिचे दुःख, वेदना हळूहळू कमी होऊ लागले साधारणपणे १५–२० दिवसात तिच्या प्रकृतीला खुपच आराम पडू लागला. घरातल्या घरात ती हिंडू फिरू लागली. ही सर्व खरोखर श्रीसाईनाथांचीच कृपा होय. ज्या दुःसह व्याधीने माझी आई पिडीत झाली होती. त्या व्याधीतून श्री साईनीच तिची मुक्तता केली. श्रीसाईबाबांची लीला अगाध आहे. **"जो जो मज भजे जैसा जैसा भावे । तैसा तैसा पावे मीही त्यासी"** या श्रीसाईबाबांच्या अमर वचनाचा अनुभव आम्हां सर्वांना आला, आणि म्हणूनच हा अनुभव सर्वांना कळावा म्हणून साईलीलेत देत आहे.

# साईबाबांची उदी म्हणजे अमृत संजीवनी

—श्री. सतीश अ. रेगे.
बी. ए. ऑनर्स, डी. पी. एम्.
अ—६, दुसरा मजला,
वाय्. एम्. सी. च्या मागे,
अंधेरी (पश्चिम), मुं. —५८

० श्री स्‌गुरु साईबाबांच्या आशीर्वादाने माझी वहिनी सौ. सीमा कुलकर्णी हिला दिड वर्षापूर्वी पुत्ररत्न झाले. त्यावेळी डिलीव्हरी नॉर्मल न होता ऑपरेशन श्री. बाबांच्या कृपेने सुखरूप झाले. तद्‌नंतर लगेच माझी बहीण गरोदर राहिली. मेडिकल शास्त्रात सांगितल्याप्रमाणे ऑपरेशन केल्यानंतर एखादी स्त्री लगेच गरोदर राहिली तर परत नॉर्मल डिलीव्हरी होणे कठीण व अशावेळी डॉक्टर जास्त रिस्क् न घेता ऑपरेशन करतात. आमच्या अंधेरी येथील प्रसिद्ध डॉक्टर श्री. प्रधान यांनी तर माझ्या भगिनीला कसलीच चिंता करू नकोस व सगळं सुखरूप होईल असा दिलासा दिला व डिलीव्हरी तारीख ऑक्टोबर १९८३ मध्ये दिली होती.

माझा तसा माझ्या भगिनीचा व त्यांच्या घरातल्या वडीलधाऱ्या माणसांचा श्री. सद्‌गुरु साईबाबांवर फारच विश्वास. मी माझ्या बहिणीला दररोज पाण्यातून श्री बाबांची उदी घ्यावयास सांगितले व त्याप्रमाणे माझी बहिण सौ. सीमा कुलकर्णी नित्य नियमाने घेत असे. मधल्या काळात माझ्या बहिणीचा आत्मविश्वास वाढावा म्हणून मी कै. श्री. र. स. जुन्नरकरांनी लिहिलेले "मशिदीत प्रकटला परमेश्वर" हे पुस्तक वाचावयास दिले. शेवटी ऑक्टोबर १९८३ उजाडला. श्री सद्‌गुरु साईबाबांचे महानिर्वाण होऊन दसऱ्याला पासष्ट वर्षे पूर्ण झाली. मला मनात वाटले की माझी भगिनीला विजया दशमीला हॉस्पिटलमध्ये जावे लागेल. परंतु दुसऱ्या दिवशी पहाटे मी माझ्या डाके कॉलनीच्या रूमवर असतांना आमचा नोकर माझ्या घरी आला व मला सांगू लागला भाऊ, ताईना हॉस्पिटलमध्ये नेलं. मी मनात म्हटले की आईने माझ्या बहिणीला श्री बाबांची उदी लावली असेल कां? असा विचार करीत मी माझ्या वडील बंधूंच्या घरी (जे डॉक्टर आहेत) डी. एन. नगर, अंधेरी येथे गेलो. तेथे जाताच मी माझ्या वहिनीला प्रश्न केला की आईने सौ. सीमाला उदी लावली कां? वहिनी मला म्हणाली

उदी लावली की नाही माहित नाही परंतु कुलस्वामीनी श्री शांतादुर्गेला नारळ ठेवला तो मला माहित आहे –

नंतर ठीक आठ वाजता माझे डॉक्टर बंधू डॉ. दिलीप रेगे हॉस्पीटलमधून आले व सौ. सीमाची नॉर्मल डिलीव्हरी झाली असे सांगू लागले. परंतु मी मनात म्हटले की श्री बाबांनी नक्कीच काहीतरी चमत्कार केला असेल व खरोखरच श्री साईसत् चरित्रामध्ये सांगितल्या प्रमाणे आमच्या बहिणीच्या बाबतीत चमत्कार श्री बाबांच्या उदीमुळे घडला होता व नंतरची सगळी माहिती माझ्या आईकडून हॉस्पिटल मधून आल्यावर मला कळली. ती खालीलप्रमाणे –

पहाटे म्हणजे चार वाजता माझ्या बहिणीला श्री. प्रधानांच्या हॉस्पिटलमध्ये आणल्यावर लेबररूम मध्ये घेऊन न जाता सरळ ऑपरेशन रूम मध्ये नेण्यात आले. कारण का तर डॉक्टर कोणतीच रिस्क घेण्यास तयार नव्हते. तशी समज त्यांनी माझ्या भगिनीला दिली होती. त्यांनी माझ्या बहिणीला पोटात दुखू लागल्यावर लगेच कसलाच वेळ न दवडता येण्यास सांगितले होते. तेथे गेल्यावर थोड्याच वेळाने डॉक्टर हॉस्पिटलमध्ये दाखल झाले व आणखी थोड्या वेळाने त्यांची कन्या तीसुद्धा डॉक्टर आहे, ती येऊन दाखल झाली. त्यानंतर ॲनेस्थेसिअसिष्ट आला, व ऑपरेशन रूममध्ये सगळी जय्यत तयारी झाली होती. इतक्यात माझ्या आईला तिच्या पर्समधील श्री बाबांच्या उदीची आठवण झाली. ती उदी सुद्धा मी माझ्या आईला ती प्रवासाला गेली असताना दिली होती. माझ्या आईने पर्समधील उदी मिळताच श्री सद्गुरु बाबांचे नाव घेत ऑपरेशन रूमकडे धाव घेतली व तेथील नर्सला ऑपरेशन रूम उघडण्याची विनंती केली. तिने ऑपरेशन रूम उघडताच आईने माझ्या भगिनीला श्री बाबांची उदी कपाळी लावली व नंतर थोड्या वेळाने बाहेर येताच माझ्या बहिणीची नॉर्मल डिलीव्हरी होऊन तिला कन्यारत्न झाले. श्री सद्गुरु बाबांच्या उदीचा हा चमत्कार श्री साई सत्चरितां मध्ये सांगितल्याप्रमाणे होता. तेथे बाबांनी श्री. चांदोरकरांच्या मुलीला प्रसूती वेदनांपासून ते प्रसूती सुखरूप होईपर्यंत सांभाळले. खरोखर श्री सद्गुरु बाबांच्या उदीने माझ्या बहिणीला प्रसूती सुखरूप होईपर्यंत सांभाळले. माझ्या बहिणीचे अजूनही हा चमत्कार सांगताना डोळे पाणावतात.

श्री बाबांच्या उदी विषयी मला आलेला आणखी एक अनुभव म्हणजे कोणीही व्यक्ती ती घरातील असो वा आपल्या मित्र परिवारातील असो, प्रवासात जाताना मी श्री बाबांची उदी त्यांना कागदात बांधून देतो. त्याप्रमाणे मी माझ्या

भगिनींचे यजमान श्री. किशोर कुलकर्णी जे मागच्या वर्षी सौदी अरेबियाला गेले होते, त्यावेळी प्रवासात त्यांना कुठलाच त्रास होऊ नये म्हणून मी श्री बाबांची उदी कागदात बांधून दिली होती. ते एकदा सौदी अरेबियात असताना कारमधून चालले होते. बरोबर त्यांच्या ऑफिसमधली दुसरी व्यक्ति होती सौदी अरेबियात मधून मधून फार वादळे होतात व त्यामुळे वाळूचे डोंगर तयार होतात. अशाच एका वादळात माझ्या भगिनीच्या यजमानांची गाडी सापडली. त्यांच्या बरोबर असलेली व्यक्ति घाबरून गाडीचा दरवाजा उघडून पळाली. परंतु माझ्या बहिणीचे यजमान तेथे गाडीतच बसून राहिले व वादळ शांत होताच गाडीतून निघून गेले. नंतर त्यांना बातमी समजली की त्यांच्याबरोबर असलेल्या ऑफीसच्या व्यक्तीला हॉस्पिटलमध्ये न्यावे लागले. माझ्या भावोजींनी नंतर मान्य केले की ही सगळी बाबांच्या उदीची करामत जेणेकरून त्याना गाडीत श्री बाबांनी सुखरूप ठेवले.

तसेच आमच्या कंपनीतील एक कामगार अधिकारी श्री. अ. व. सावंत यांचा श्री सद्‌गुरु साईबाबांवर व त्यांच्या उदीवर फारच विश्वास. मी, त्याना माझ्या कडून श्री सद्‌गुरु बाबांची उदी कागदात बांधून दिली होती. असेच एकदा ते आमच्या दुसऱ्या कंपनीत गेले असताना तेथील कामगारांनी अचानक संप पुकारला. आमचे कामगार अधिकारी घाबरले व कामगारांनी काम थांबविल्यामुळे त्यांची कसोटी होती. श्री. अ. व. सावंत यानी खिशातील उदी काढून श्री सद्‌गुरु बाबांना प्रार्थना केली की बाबा आता लवकरात लवकर कामगारांना काम सुरू करण्यास सांगा आणि काय आश्चर्य थोड्याच वेळाने कामगार कामावर रूजू झाले खरोखरच श्री बाबांच्या उदीचा हा आणखी एक चमत्कार.

आमच्या कंपनीत हल्लीच टेंपररी साठी कु. गावडे नावाची एक मुलगी टायपिस्ट म्हणून घेतली आहे. तिच्या लहान बहिणीला मागच्या महिन्यात त्यांच्या घरी पाळलेला कुत्रा दोनदा चावला व तिने घरी न सांगितल्या मुळे तिला कुत्र्याचे विष चढले. ती बेशुद्ध झाली. लगेच तिला हॉस्पिटलमध्ये हलविले. तिथे ती चार दिवस सतत बेशुद्ध होती व डॉक्टरांनी सुद्धा आशा सोडली होती. मी माझ्याकडील श्री बाबांची उदी तिला नेऊन दिली, व कु. गावडेला तिच्या बहिणीला लावण्यास सांगितले आणि काय चमत्कार तिच्या बहिणीमध्ये हळू हळू फरक जाणवू लागला. सलाईन शरीरात जाण्यास सुरवात झाली व तिची दृष्टी गेली आहे तीसुद्धा उदीमुळे परत येईल असा मला विश्वास आहे. खरोखरच बाबांची उदी म्हणजे साक्षात् अमृत संजीवनीच.

❖ ◆ ❖

# उदी हा रामबाण उपाय !

—सौ. विनोदिनी मा. राजपूत.
२०३, लेक पॅलेस,
मरोल व्हीलेज, अंधेरी (पूर्व)
मुंबई, ४०० ०५९.

० मला उदीचे बरेच अनुभव आहेत. मी कुठेही जाताना उदीची छोटीशी पुडी पर्समध्ये ठेवूनच बाहेर पडत असते.

मला २ मुले आहेत. मोठा वेदान्त अतिशय मस्तीखोर व वंड! अनेकवेळा पडतो झडतो. शेवटी त्याचे पडणे बघून मी घाबरुन न जाता त्याच्या प्रत्येक छोट्या–मोठ्या जखमेवर उदी लावित असते. २–३ तासात जखमेचा नामोनिशान नसतो. हल्ली तर तो माझी वाटच पाहत नाहीं. लागले की स्वत: उदी लावून घेतो; व मग मला सांगतो.

तसेच माझा २ रा मुलगा सिद्धांत १ वर्षाचा आहे. तो नेहमी तोंडावर आपटतो, आणि तोंडातून रक्त येते. प्रथम मी घाबरत असे काय करावे सुचत नसे. पण लगेच माझ्या लक्षात उदी येते. रक्त येत असले तरी उदी चटकन् त्याच्या तोंडात टाकते. त्याचे रक्त तर थांबतेच. पण तो हसून परत खेळू लागतो.

२६ नोव्हेंबरला आम्ही औरंगाबादला गेलो होतो. प्रथम शिर्डी दर्शन घेतले मग औरंगाबादला गेलो. तेथे एम्. टी. डी. सी. च्या लॉजवर राहिलो. १०॥ वाजता रात्री पोचलो जेवण करून झोपायला खोलीवर आलो ११। वाजले व छोट्या सिद्धान्तला सारख्या पिवळ्या रंगाच्या उलट्या होऊ लागल्या मी व माझे मिस्टर घाबरून गेलो. बरं १५ मिनिटांनी सारख्या उलट्या होत होत्या. १२॥ वाजले. परदेशचा प्रवास. तेथील काहीही माहिती नाहीं. डॉक्टर कुठे काय कसे बोलविणार? शेवटी २ वाजता रात्री माझ्या पर्समधून उदी काढली त्याच्या तोंडात ३ चिमटी बाबांचे स्मरण करून टाकली व संपूर्ण अंगाला लावली, व बाबांना शरण गेले, आणि काय आश्चर्य उलटी एकदम थांबली. आजपर्यंत त्याला कधीही उलटी झाली नाहीं.

अशा या बहुगुणी उदीचा मला खूपच उपयोग होत असतो. ★

# प्राण्यांवर सुद्धा उदीचा प्रभाव

—श्री. राजेंद्र शंकर कदम
गणेश भुवन, शेटचे चाळ, रत्नागिरी.

० श्री साईबाबांच्या उदीचा प्रभाव फक्त मानवावरच होत नसून इतर प्राण्यांवरसुद्धा होतो. याचा अनुभव दि. १७ जून १९८३ रोजी आम्हांला आला आहे.

आम्ही श्री. साईबाबांचे निस्सिम भक्त आहोत. आमच्याकडे एक मांजर आहे. दि. १६ जून १९८३ गुरुवारचा दिवस. आईने काहीतरी पदार्थ तळून तवा गॅसवरच ठेवून हात धुण्यासाठी बाजूला गेली इतक्यात त्या मांजराला भिंतीवर काहीतरी दिसले म्हणून त्याने त्याच्यावर उडी मारली. ते मांजर उकळलेल्या तेलात पडले, व जबरदस्त भाजले. ते भाजल्यानंतर ते कुठेतरी पळून गेले. त्याची आम्ही शोधाशोध केली. परंतु ते सापडले नाहीं.

आईने साईबाबांसमोर गाऱ्हाणे सुरू केले की, बाबा मांजर कुठे गेले ते सापडू दे! ते जिवंत असू दे. दुसऱ्या दिवशी माझ्या असे लक्षात आले की काल साईबाबांना हार घातलेले नाहींत. कारण आम्ही दर गुरुवारी साईबाबांना हार घालत असतो. परंतु त्यादिवशी घाईगडबडीत विसरून गेलो. मला आठवण होताच मी ताबडतोब हार घेऊन आलो, व हार घातले. नंतर थोडयाच वेळाने आमच्या पाठच्या बाजूला ते मांजर हळू आवाजात कण्हताना भावाच्या दृष्टीस पडले. त्याला अजिबात चालवत नव्हते. म्हणून त्याला उचलून आणले. त्याचे पोट जबरदस्त भाजले होते. वरची कातडी निघून गेली होती. ते जगेल की नाही याबाबत आम्हांला शंका होती.

परंतु आईने त्याला दुधातून उदी दिली; व साईबाबांना सांगितले की, हे मांजर या उदीने बरे होऊ दे! याबाबतचा लेख मी साईलीला मासिकात पाठविन. तसेच आम्ही मांजराच्या जखमेवर फुरासिन मलम लावत असू. त्याच्यात सुद्धा आम्ही उदी मिसळली होती.

अशा रीतीने जवळ जवळ आठ–दहा दिवस उदी सतत देत राहिलो, व ते मांजर पंधरा दिवसातच चांगले बरे झाले. ते चांगले हिंडू फिरू लागले आहे. त्याच्या जखमासुद्धा बऱ्या झाल्या.

अशी या सद्‌गुरुची किमया आहे. त्यांच्या उदीमुळे फक्त मानवच नव्हे तर प्राणीसुद्धा बरे होतात.

"थोर मनाचा अनंत गुणांचा
शिरडीचा राजा, साईनाथ माझा" ☆

# साईबाबां विषयी माझे काही अनुभव

***********************

—श्रीमती इंदुमती चौबळ.
माहिम मुंबई–१६

० अत्यंत बालपणापासूनच आम्हां सर्व मंडळींना (चोणकर कुटुंबाला) श्रीसाईबाबांच्या भक्तीचा, व त्यांच्यावरील श्रद्धेचा मनोमन लळा. किंबहुना, श्रीसाई हेच जणू आमचे दैवत. माझे वडील कै. रामकृष्ण मा. चोणकर यांना तर प्रत्यक्ष साईबाबांचे दर्शन व सहवास. दादर आगर बाझार हे आमचे जन्मस्थान. माझे वडील त्याकाळचे म्हणजे १९२७ च्या सुमारास दादर मधील एक ख्यातनाम नगर सेवक होते. ते स्वत: शिरडीला जात व श्री बाबांची सेवा करीत. बाबा मागतील तेवढी दक्षणा अत्यंत खुषीने अर्पण करीत आणि त्यामुळे अर्थातच गोर-गरिबांची एक प्रकारची सेवाच होत असे. कारण बाबांना दक्षणा म्हणून दिली गेलेली रक्कम गोर गरिबांना वाटण्यात येत असे. माझ्या माहेरी अजूनही बाबांचा लाइफसाईझ रंगीत फोटो आहे व त्याची नित्य नियमाने पुजा–आरती वगैरे केली जाते. म्हणजेच साई हेच प्रामुख्याने दैवत गणले जाते.

विवाहानंतर सासरच्या मंडळीतही तोच अनुभव येऊ लागला. माझे सासरे कै. त्रिंबकराव आ. चौबळ हेही नित्य नियमाने शिर्डीची वारी करीत व त्यांच्याकडूनही श्री बाबांची सेवा घडत असे. एका दसऱ्याच्या उत्सवाला १९४० च्या सुमारास माझ्या कै. मामंजीबरोबरच मी शिर्डीला श्रीसाई उत्सवाला गेले होते; आणि त्यानंतर जवळ जवळ दरवर्षीच मला शिर्डीला जाण्याची सुसंधी मिळत गेली. दरवेळी मला श्री बाबांसमोर भजने व भावगीते गाण्याची संधी मिळत होती. श्रीसाई दरबारात रात्री भक्त मंडळीसमोर साईंची संगीत सेवा करण्याचा मधुर अनुभव मिळाला आहे. शिवाय दरवेळी १ श्रीफळ व १ रुपया दक्षणा रूपाने मिळत गेली आहे.

मला प्रत्यक्ष आलेले अनुभव असंख्य आहेत त्यापैकी १–२ प्रस्तुत लिखाणात नमूद करायला हरकत नाहींत परंतु माझ्या मित्र परिवारात व शिष्यगणात आलेले अनुभव जास्त महत्त्वाचे व उल्लेखनीय आहेत. १९४४ च्या सुमारास माहिम येथील एका भव्य साई उत्सवात भजने गाण्याकरतां मला आमंत्रण होते. मला इतर कित्येक संतांचे अभंग व भजनें गाता येत होती पण श्रीबाबांचे एकही भजन

येत नव्हते. फार मोठा प्रश्न माझ्या मनापुढे उभा राहिला. साई उत्सवात साईंचे एकही गीत आपल्याला येऊ नये? केवढी मोठी निराशा. सकाळी पूजा झाल्यावर बाबांच्या फोटोसमोर मी शांत चित्ताने हात जोडून उभी राहिले आणि बाबांना मनोमन आळवले "देवा! आज रात्री तुमच्या समोर मी इतर भक्तीगीते गाणार, आणि तुमचे एकही गीत आपल्याला पेश करता येऊ नये?" आणि काय चमत्कार! शब्द सुचू लागले अगदी चाली सकट आणि तेही हिंदी भाषेत मी टेबल खुर्ची घेतली आणि कागदावर लिहू लागले जसे बाबांनी दिले तसेच. ते भजन पुढे श्रीसाईलीला मासिकात छापूनही आले आणि कित्येक साईभक्त ते फार सुंदर आळवतात. उदा. : सौ. माणिक वर्मा, सौ. मधुबाला चावला, वगैरे. त्या रात्री जवळ जवळ २ हजार श्रोत्यांसमोर मी ते गीत प्रथम आळवले. साथीला होते. श्री. स्नेहल भाटकर व कै. वसंत आचरेकर.

**'मुखसे साईनाम लेना, साई चरणको कभी नहीं भुलना ।।धृ.।।**
**साई नाम है सबका प्यारा**
**भक्त जनों का एक सहारा**
**साई बीना कछु नहीं पाना ।। साई नाम लेना**
**दीन पतित का साई खवैया**
**पार लगावो मोरी नैया,**
**विनति हमारी यह सून लेना ।। साई नाम लेना**

आणि ह्या एकाच भजनावर साई भक्त इतके खुष झाले की संपूर्ण कार्यक्रम अत्यंत यशस्वी झाला. भक्तांनी टाळ्यांचा कडकडाट केला. साईप्रसाद तर मिळालाच पण तेव्हांपासून काव्य स्फूर्तीही होऊ लागली आणि नंतर भजने व भावगीते लिहिण्याची स्फूर्ति बाबांनीच दिली.

१९४३ मध्ये केवळ बाबांच्याच कृपेने मला कराचीला गणेशोत्सवाचे आमंत्रण आले. मी व कै. वसंतराव कराचीला गेलो आणि सतत १० दिवस अनेक ठिकाणी मी कार्यक्रम करीत होते. कराचीला गायना करता गेलेली पहिली गायिका. कराचीच्या गायनप्रेमी लोकांनी अक्षरश: त्यावेळी प्रेम, पैसा व बक्षिसे यांचा माझ्यावर वर्षाव केला. हे सर्व सुरळीत जमून आले, ह्याला कारण, माझ्या मते फक्त साई भक्तीच!

आता इतर मंडळींना आलेले अनुभव काहीं ठिकाणी तर अक्षरश: साईबाबांच्या उदीप्रसादामुळे आश्चर्यकारक चमत्कार घडून आले आहेत. उदा. एक

येत नव्हते. फार मोठा प्रश्न माझ्या मनापुढे उभा राहिला. साई उत्सवात साईंचे एकही गीत आपल्याला येऊ नये? केवढी मोठी निराशा. सकाळी पूजा झाल्यावर बाबांच्या फोटोसमोर मी शांत चित्ताने हात जोडून उभी राहिले आणि बाबांना मनोमन आळवले "देवा! आज रात्री तुमच्या समोर मी इतर भक्तीगीते गाणार, आणि तुमचे एकही गीत आपल्याला पेश करता येऊ नये?" आणि काय चमत्कार! शब्द सुचू लागले अगदी चाली सकट आणि तेही हिंदी भाषेत मी टेबल खुर्ची घेतली आणि कागदावर लिहू लागले जसे बाबांनी दिले तसेच. ते भजन पुढे श्रीसाईलीला मासिकात छापूनही आले आणि कित्येक साईभक्त ते फार सुंदर आळवतात. उदा. : सौ. माणिक वर्मा, सौ. मधुबाला चावला, वगैरे. त्या रात्री जवळ जवळ २ हजार श्रोत्यांसमोर मी ते गीत प्रथम आळवले. साथीला होते. श्री. स्नेहल भाटकर व कै. वसंत आचरेकर.

**'मुखसे साईनाम लेना, साई चरणको कभी नहीं भुलना ।।धृ.।।**
**साई नाम है सबका प्यारा**
**भक्त जनों का एक सहारा**
**साई बीना कछु नहीं पाना ।। साई नाम लेना**
**दीन पतित का साई खवैया**
**पार लगावो मोरी नैया,**
**विनति हमारी यह सून लेना ।। साई नाम लेना**

आणि ह्या एकाच भजनावर साई भक्त इतके खुष झाले की संपूर्ण कार्यक्रम अत्यंत यशस्वी झाला. भक्तांनी टाळ्यांचा कडकडाट केला. साईप्रसाद तर मिळालाच पण तेव्हांपासून काव्य स्फूर्तीही होऊ लागली आणि नंतर भजने व भावगीते लिहिण्याची स्फूर्ति बाबांनीच दिली.

१९४३ मध्ये केवळ बाबांच्याच कृपेने मला कराचीला गणेशोत्सवाचे आमंत्रण आले. मी व कै. वसंतराव कराचीला गेलो आणि सतत १० दिवस अनेक ठिकाणी मी कार्यक्रम करीत होते. कराचीला गायना करता गेलेली पहिली गायिका. कराचीच्या गायनप्रेमी लोकांनी अक्षरश: त्यावेळी प्रेम, पैसा व बक्षिसे यांचा माझ्यावर वर्षाव केला. हे सर्व सुरळीत जमून आले, ह्याला कारण, माझ्या मते फक्त साई भक्तीच!

आता इतर मंडळींना आलेले अनुभव काहीं ठिकाणी तर अक्षरश: साईबाबांच्या उदीप्रसादामुळे आश्चर्यकारक चमत्कार घडून आले आहेत. उदा. एक

वांद्र्याला राहणाऱ्या सुखवस्तु विधवाबाई एकदा आल्या आणि म्हणाल्या, "हे बघ तू इतकी साई भक्ती करतेस तर माझे एक काम करशील का?" मी म्हटले, "जरूर, मी फक्त अंतःकरणपूर्वक बाबांना तुझी अडचण निवेदन करीन आणि माझी खात्री आहे तुझी समस्या काहीं महिन्यांनी सहजरित्या सुटेल" तिने नंतर सांगितलेली हकिकत खरोखरीच भयंकर होती. तिच्या घरातल्या मंडळीवर कोणीतरी जादूटोणा केला होता व ती वारंवार आजारी पडते. काम-धंदा चालत नसे. मी तिला फक्त एक उदीची पुडी बाबांच्या पायाला लावून दिली व सांगितले ही कुठे तरी नीट जपून ठेऊन दे आणि मनःपूर्वक देवाला प्रार्थना कर म्हणजे तुझे काम होईल. ती निघून गेली. त्यानंतर तिच्याकडून काहीच खबर नव्हती त्यामुळे मला किंचित काळजी वाटत होती पण बाबांवरील निस्सीम श्रद्धेमुळे मन साशंक नव्हते. ४च महिन्यात तिचा भाऊ आला सोबत एक सुंदर हार व पेढ्यांची पेटी. एवढेच म्हणाला "ताईचे काम झाले आहे" तिची समस्या संपूर्ण सुटली आहे. मी बाबांना हार घातला नैवेद्य दाखवला. त्या पेटीतील पेढे प्रसाद म्हणून त्याच्याबरोबर पाठवून दिले. मनात बाबांचे शतशः आभार मानले. धन्य धन्य साईलीला.

आणखी एक चमत्कार एका तरुण् जोडप्याला १० वर्ष मूल नव्हते. १९८१ च्या साई उत्सवाला मुलाच्या आईने आमच्याकडे येऊन शिऱ्याचा जवळ जवळ १। किलोचा नैवेद्य दाखवला व प्रार्थना केली "पुढल्या वर्षी माझ्या घरात पाळणा हलला तर मी त्याच्याहून दुप्पट नैवेद्य घेऊन येईन; आणि महत् आश्चर्याची गोष्ट अशी की १९८२ च्या श्री साई उत्सवा पूर्वी २ च महिने त्यांच्या घरी कन्यारत्न जन्माला आले. मुलीचे आईबाप बहिरे—मुके आहेत पण मुलगी बोलकी निघाली. धन्य धन्य साई!

ह्याच उदीमुळे काहीं १–२ मुलांना दृष्टिलाभ झाला आहे. नोकऱ्या मिळाल्या आहेत, विवाह जमले आहेत, इतकेच नव्हे तर नवऱ्याने त्यक्ता म्हणून सोडून दिलेल्या आपल्या पत्नीला पुनः स्वखुषीने घरी बोलावून आज ती आनंदाने संसार करीत आहेत. एका मुलाचा तर असाध्य रोगही उदीच्या प्रभावाने बराचसा आवाक्यात आला आहे. इतर अनेक नव्हे असंख्य अनुभव गाठीला आहेत पण स्थला अभावी ते सर्वच नमूद करणे शक्य नाहीं.

माझा स्वतःचा एक अत्यंत महत्त्वाचा अनुभव असा आहे की अगदी अंतः-करणपूर्वक शिर्डीला जाण्याची मला इच्छा झाली की कोणातरी धनाढ्य विद्या-

र्थिनीची (विशेषतः मुंबईचे ख्यातनाम मारवाडी मोरारका) गाडी दाराशी येते. ड्रायव्हर असतोच आणि आम्ही आमच्या राम मंदिरातून पहाटे निघतो, शिर्डीला जातो, बाबांच्या चरणी लीन होतो उदी प्रसाद घेतो आणि मग तृप्त होऊन रात्री घरी परततो. अशा तऱ्हेच्या भेटी अनेकदा झाल्या आहेत पण १९८३ मध्ये दोनदा बाबांनी मला अशी संधी दिली. एकदा २३ फेब्रुवारीला संपूर्ण संचासकट तबलजी, व्हायोलिनिस्ट, एक मानस कन्या व मुंबई नभोवाणीच्या निवेदिका कमलिनी विजयकर. कमलिनीताईंनी निवेदन केले व मी भक्तीगीते आळवली. अशा तऱ्हेची संधी खरोखरीच मोठमोठ्या रेडिओ कलावंतांनाहीं अजून मिळालेली नाहीं कारण कमलिनी प्रथमच गेली व तिने बाबांचे दर्शन प्रथमच केले. ह्या भेटीला श्री साईनी दिलेली व्ही. आय. पी. ट्रीटमेंट मी समजते. दुसरी ट्रीप गुरुपौर्णिमेला अशीच त्याच विद्यार्थिनीच्या गाडीने घरच्या सर्व मंडळींबरोबर गुरुपौर्णिमेला गुरुदर्शन! केवढा भाग्याचा दिवस!

दरवर्षी दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी आम्ही घरी सजावट करतो. पूजा करतो अनेक सुप्रसिद्ध गायक कलावंत येतात. बिदागीशिवाय गातात व १ रुपया व १ श्रीफळ दक्षणा घेऊन जातात. त्यात नामवंत गायक–गायिका असतात उदा. : पंडित जसराज, सौ. माणिक वर्मा, सौ. मधुबाला चावला श्री. कृष्णराव चोणकर (बंधु) आणि तबलजी असतात माझे मानसपुत्र श्री. दिलीप करवीर.

एका गोष्टीचा उल्लेख केल्याशिवाय लेखणी खाली ठेवता येणार नाहीं. मला दिली गेलेली श्रीसाईची प्रतिमा (सुंदर पुतळा) सद्याचे हिंदु कॉलनीतील डॉ. नीलम तुंगारे यांच्या कै. मातोश्री सौ. कुमुद तुंगारे यांनी १९६१ साली मला बक्षिस दिली होती. त्या पुतळ्यामध्ये मला माझी ती दिवंगत मैत्रीण, बहीण कायम दिसते. आणि मन भरून येते.

माझा पुत्र अरुण, स्नुषा सौ. उषा व दोन्ही नाती चि. अंजली व चि. शीतल ह्या उत्सवात आनंदाने भाग घेतात. तो एक दिवस भक्तांची भेट घेण्यात जातो. घर आनंदाने भरून जाते. उणीव एकच असते ती ही की बाबांचे परमभक्त माझे पती कै. वसंतराव आज तो सोहळा पाहण्यास या दुनियेत नाहीत. एका गुरुवारीच श्रीसाईचरणी ते विलीन झाले! त्यांना साधुसंतां सारखे बोलावणे आले आता उरल्या फक्त आठवणी!

# भक्तांचे कनवाळू बाबा

***卐****卐***

—श्री. सच्चिदानंद गोविंद रोडे
३०९ कोळी आळी,
महाबळेश्वर ४१२ ८०६.
(जिल्हा – सातारा)

० १७ जून १९८३ ची गोष्ट आम्ही आमच्या मुलीकडे मुंबईला जात होतो. आमची सकाळची पांचगणी मुंबई बसची दोन तिकिटे रिझर्व केली होती. सकाळी ९॥ वा. पांचगणीहून बस महाबळेश्वरला येते व ९–४० ला सुटते. त्याप्रमाणे बस राईट टाईम आली.

आमचे सीट नं. ४१ व ४२ होते. सिझनची गर्दी चिक्कार होती, त्यामुळे बसचे रिझर्वेशन फूल होते. आमच्या नेहमीच्या बसमधील सीटस् नंबर १ व २, अगदी ९९ टक्के आम्हांला हेच नंबर कुठून कुठेही जात असलो तरी ह्याच आवडीच्या सीटवर बसायला मिळणार.

आता ह्यावेळी मागचे नंबर मिळाले प्रकृती पण थोडीशी बरी नव्हती, बाबांना म्हटलं, ह्यावेळी नंबर १–२ नाहीं कां मिळणार? असे मनांत म्हणून बसमध्ये चढलो व रिझर्व्हेशन कंडक्टरला दाखवून १।२ नंबरची चौकशी करण्या-पूर्वीच तो म्हणाला, साहेब नंबर १।२ वर बसा त्या नंबरवरचे प्रवासी येणार नाहींत. दिले नां बाबांनी आमचे नेहमीचे नंबर १।२.

बसमध्ये बसलो न बसलो तोच कंडक्टर ओरडला सर्वांनी खाली उतरावे बसचे पुढचे चाक पंक्चर आहे. आम्ही सर्व खाली उतरलो. बस डेपो मध्ये गेली किती वेळ लागणार याची चौकशी केली तेव्हां समजले अर्धा पाऊण तास लागेल म्हणजे अर्धा पाऊण तास मुंबईला लेट जाणार, दादरला ४ वाजता जायच्या ऐवजी ४–४॥ होणार.

आम्हांला मुंबईची फारशी माहिती नाही त्यात आमच्या जावयाने सायन भागात नवीन ब्लॉक घेतला. त्या बाजूची तर मुळीच माहिती नव्हती म्हणून मुलीला दादरच्या बस स्टँडवर आम्हांला घेण्यासाठी ये म्हणून पत्र लिहिले होते.

आमच्या जावईबापूंना त्यांच्या कामधंद्यामुळे वेळ मिळणे शक्य नव्हते. बर आमच्या मुलीबरोबर तिचा लहान २ वर्षाचा मुलगा (आमचा नातू) त्यालाही ती बरोबर आणणारच आणि आमची बस लेट होणार असल्याने त्यांना स्टँडवर कंटाळवाणे उभे रहावे लागणार. या विचाराने मन थोडेसे अस्वस्थ झाले, शेवटी 'बाबांच्या' वर सर्व गोष्टी सोपविण्याची आम्हांला सवयच झाली आहे त्याप्रमाणे सर्व त्यांच्यावर सोपवून दिले.

इकडे बस अर्ध्या तासातच दुरुस्त होऊन आली व आम्ही मुंबईच्या वाटेला प्रवास करू लागलो. आम्ही ठरलेल्या वेळेपेक्षा अर्धा तास दादरला उशीरा पोहोचलो म्हणजे ४॥ वा. पोहोचलो. आमची मुलगी व आमचा नातू आमची वाट पहात उभे होते. आमच्या छोटचा नातवाचे तोंड, उन्हांत उभे राहून अगदी म्लान झाले होते. आम्हांला पाहून त्यांना खूपच आनंद झाला. आमची मुलगी म्हणाली पांच मिनिटे तुमची बस नसती आली तर आम्ही घरी परत जाणार होतो, आम्ही, कां? विचारावयाचे आतच ती पुढे म्हणाली कालपासून छोटयाला खूप ताप आहे आणि आत्तासुद्धा तापाचाच बरोबर आणला आहे. आजोबा आजी येणार या आनंदात बराच वेळ इथे स्टँडवर काढला पण तापामुळे त्याची बेचैनी वाढली व घरी चल म्हणत होता.

आम्ही प्रथम त्वरीत टॅक्सी ठरवून सर्वजण टॅक्सीत बसलो छोटयाला ताप बराच होता. परंतु आम्हांला पाहून त्याला इतका आनंद झाला होता त्या आनंदाच्या भरात खूप ओरडून आणि मोठमोठ्याने हांसून आम्हांला काहीं काहीं सांगत होता मी प्रथम 'बाबांची' उदी त्याला (टॅक्सीतच) लावून 'बाबांना' मनोमन सांगितले की 'बाबा' माझ्या उदीला लवकर बर वाटू द्या. त्याच्या आईवडिलांनी त्याचे नाव अरुण ठेवले आहे, मी त्याचे नाव उदय ठेवले असून प्रेमानी व लाडानी त्याला उदी म्हणून हांक मारतो, आणि नावाप्रमाणेच बाबांच्या उदीवर फार फार प्रेम आहे. माझ्या छोटचा उदयचे. दिवसांतून अनेकवेळा त्याला उदी खायला लागते, कपाळाला लावावयाला पाहिजे. 'बाबांची' आरती करतांना माझ्या कडेवर बसून 'बाबांच्या' फोटोला उदबत्ती फिरवायला पाहिजे असा हा माझा उदी बाळ त्याला उदी लावून 'बाबांना' त्याचा ताप उतरून लवकर बरे वाटू द्या म्हणून प्रार्थना केली.

आम्ही घरी आलो. माझ्या छोटचा उदीला पुष्कळच बरे वाटले होते, त्याच्या करता खाऊ, खेळणी आम्ही नेली होती; ते सर्व पाहून त्याच्या आनंदाला

पार नव्हता. आदल्या दिवसापासून त्याच्या अंगात २ पर्यंत ताप, पोटात अन्नाचा कण नाहीं अशा परिस्थितीत तो इतका आनंदाने खेळला की त्याची आई म्हणाली कालपासून माझ्या मांडीवरून जरासुद्धा खाली उतरला नाहीं. सारखा मांडीवर निजून होता, आणि आता इतका खेळतो आहे, कोणी पाहिले तर खर सुद्धा वाटणार नाहीं. कालपासून २ पर्यंत ताप आहे ह्या मुलाला.

संध्याकाळी तापाने पुन्हां जोर केला. स्वारी तशी शांत निजून होती. मी पुन्हां 'बाबांची' उदी त्याच्या सर्व अंगाला लावली, कपाळाला लावली आणि 'बाबांना' पुन्हां श्रद्धापूर्वक अंतःकरणाने प्रार्थना केली की बाबा याला लवकर बरे वाटू द्या. मी हे सर्व साईलीला मासिकात लगेच देईन.

आणि काय चमत्कार!!! सांगून, वाचून, ऐकून कोणाला खर वाटणार नाहीं. रात्री ८॥ ला उदी बाळाला संपूर्ण बरे वाटले. ताप नॉर्मल झाला. दुध प्यायला व स्वारी पुन्हां आजोबा, आजोबा, आजी आजी म्हणून खेळू लागली. त्याच्या नंतर त्याला पुन्हां ताप चढला नाहीं. आम्ही ३–४ दिवस राहिलो आम्हांला त्याच्याशी खूप खेळायला मिळाले. आम्ही सर्वजण फारच मजेत व आनंदात राहिलो.

बाबांची लीला, बाबांचे प्रेम, बाबांची शक्ती इतकी महान इतकी अगाध आहे की तिचे वर्णन शब्दात करणे शक्य नाहीं. हे सर्व साईभक्तांना मान्य करावे लागेल.

ज्या भक्ताजवळ श्रद्धा व सबुरी आहे त्याच्या जवळ सदैव 'बाबा' कोणाच्यान कोणाच्या रूपाने वास करीत असतात आपण फक्त इतकेच करावयाचे "बाबांचे अखंड चिंतन" आपली सर्व चिंता त्याला. अशा भक्ताच्या कनवाळू 'बाबांना' आमचे कोटी कोटी साष्टांग दंडवत.

# उदी एक विस्मयकारक औषध

—श्री. जगदीश दि. शेलटकर
द्वारा. बा. भि. कदम
बी. एम. सी. ऑफिसर्स क्वार्टर्स,
२।१४, ११३, डॉ. ॲनी बेझंट रोड
वरळी, मुंबई – ४०० ०१८.

० डिसेंबर महिन्यातील १६ तारखेची गोष्ट आम्ही राहातो त्या कंपाउंड-मधील एक कुत्रा अलिकडे आम्ही राहातो त्याच घरी जेवायला व झोपायला असतो. फक्त रात्री बिचारा घराबाहेर राहातो. त्या कुत्र्यावर माझा विलक्षण जीव जडला. तसा मी स्वभावत:च प्राण्यांविषयी जास्त हळवा व संवेदनशील. या विलक्षण भूतदयेमुळे प्राण्यांविषयीच्या आत्यंतिक सहानुभूतीमुळे मी अनेक वर्षे सतत कष्ट, दगदग व सर्व प्रकारची झीज सहन करत आलो आहे. हा कुत्राही माझ्याविषयी आत्मियता दाखवितो प्रेम व्यक्त करतो त्याच्या मूक भाषेतून.

नेहमी प्रमाने आम्ही याला भात–चपाती दिली की हा अलिकडे तोंड फिर-वायचा. अशाला त्याने जवळ जवळ ६–७ दिवस तोंड लावल नाहीं. घरची मंडळी म्हणायची की याला फार मस्ती आली आहे, त्याचे मिजास–थाट जास्तच वाढले आहेत. मी म्हणत असे की हा कुठून तरी खाऊन आला असेल म्हणून याला भक नसेल. एक दिवस सहज माझ्या पत्नीचे लक्ष गेले. ती पाहते तर काय; कुत्र्याचा वृषणभाग खूप सुजलेला होता; चक्क मोठ्या आंब्याएवढा! ! मी घाब-रलो, चिंतेत पडलो, आता त्याला काय करायचं? प्राण्यांच्या हॉस्पिटलमध्ये न्यायला त्यावेळी तेवढा पैसा नव्हता. प्राण्यांच्या रोगांवर औषध मिळण्याच्या ठिकाणीही ( Forword trades Lalbaug ) औषधाविषयी विचारल. त्यांनी मला सांगितलं कीं, त्याचे ऑपरेशन करावे लागेल; त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल करा. हॉस्पिटलमध्ये चौकशी केली. त्यांनीही तेच सांगितले. आता काहींही करून याला हॉस्पिटलमध्ये दाखल केलच पाहिजे. त्याचे हाल माझ्याने पहावेनात. रात्री घराबाहेर घालवितांना जीवावर यायचे. खूप मानसिक वेदना व्हायच्या. कारण मीच स्वत: दुसऱ्याच्या घरी राहातो; तेथे त्याला त्याच घरी काहीवेळ रहायला मिळत ही देखील त्या साईनाथांचीच कृपा; नाहींतर त्याला केव्हाच अर्धचंद्र मिळाला असता. साईनाथांची उदी त्याला मी लावतो व त्याच्याकरता प्रार्थना करतो तीच फळाला आली असं म्हटलं पाहिजे. असो,

मी त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल करण्याचा निश्चय केला. पण काहीतरी होऊन ते टाळल गेलं व मग मी बाबांच्या उदीचा आश्रय घेतला. रोज मी उदी

चिमूटभर त्याच्या वृषणावर टाकत असे, कपाळावर लावून तोंडात देत असे. दिवसांतून तीन–तीन वेळा. पहिल्या प्रथम म्हणजे उदी पोटात गेल्याबरोबर पाच दहा मिनिटात तो खाऊ लागला. मी बाबांना प्रार्थना केली की, "बाबा! तुमच्या उदीचा प्रभाव या निराश्रीत मुक्या जनावरावर दाखवा, व मला तुमच्या उदीचा चमत्कार दाखवा. या कुत्र्याला दोन दिवसात जर गुण पडला तर मी लगेच माझा हा अनुभव "साईलीला" मध्ये पाठविन.

आणि काय चमत्कार! दुसऱ्याच दिवशी म्हणजे उदी लावायला प्रारंभ केल्यापासून दुसऱ्या दिवशी – किंचितसा फरक आढळला. मी खूप आनंदित झालो. उदी लावणं चालूच होतं. उदी लावतांना सकाळी पुजेच्यावेळी मी आमच्या स्वामी–समर्थ परिवाराचा एक मंत्र जरासा बदल करून ("जन" च्या ऐवजी "जीव" म्हणून) बाबांची उदी चिमटीत घेऊन त्या कुत्र्यासाठी म्हणत असे – तो मंत्र – "सकल जीव हिताय, श्री स्वामी समर्थाय, नमो नमो नमः" स्वामी समर्थ म्हणजे साई व साई समर्थ म्हणजे स्वामी अशी माझी श्रद्धा आहे, अनुभव आहे. तिसऱ्या दिवशी म्हणजे १८ डिसेंबरला नव्वद टक्के गुण पडला होता. माझ्या आनंदाला, समाधानाला व त्याहीपेक्षा आश्चर्याला सीमाच राहिल्या नाहींत. "बाबा! खरंच तुम्ही निराधारांचे आधार आहात! अनाथांचे नाथ आहात!! इतके दिवस मी लोकांचे अनुभव आवडीने वाचत होतो पण आज मला स्वतःला हा असा रोकडा व लोक विलक्षण अनुभव देऊन आश्चर्याचा गोड धक्काच दिलात!!!" असे धन्यतेचे उद्गार मनोमन उमटले. पुढे एकोणीस डिसेंबर ८३ ला म्हणजेच दत्तजयंतीला तो संपूर्णतः बरा झाला. नेहमीसारखा धावू–पळू लागला. भुंकू लागला, मी ग्रँटरोडवरील सुप्रसिद्ध साईधाममध्ये दत्त-जयंती निमित्त पत्नीसोबत दरवर्षा प्रमाणे गेलो. बाबांचे दर्शन घेतले. सायंकाळी दादरला स्वामी समर्थांचे दर्शन घेतले!

बाबा! तुम्ही या कलीयुगातील चमत्कार आहात! तुम्हीच श्रद्धा निर्माण करता व तुम्हीच ती वाढवता सुद्धा. शेवटी तुम्हांला एक प्रार्थना करतो की या कलीयुगाचे आवरण फोडून मानवाला तुम्हीच प्रकाशाकडे न्या. त्याच्यात सद्-गुणाचं व सद्प्रवृत्तीच बीजारोपण करा व ते वाढीला लावा. आणि जगातील मुक्या जनावरांना न्याय द्या. त्यांना आनंदाने जगू द्या! कारण ...... कारण तुम्ही आमचे सर्वांचेच साईबाबा आहात!!!

खरंच, बाबांकडे मनापासून केलेली प्रार्थना कधीच फुकट जात नाहीं! एका दुर्लक्षीत प्राण्याकरिता केलेली प्रार्थनाही त्यांच्या कृपादृष्टीला पात्र होते!!

धन्य, साईनाथा, धन्य तुम्ही!!! ☆

# उदी महिमेचा माझा अनुभव

********************

–सरदार सी. एन. साठे.
४, तिलक मार्ग, धार (म. प्र.)
धार – ४५४ ००१.

० मला श्री साईबाबांच्या कृपेमुळे शिर्डीत साईबाबांच्या समाधीचे दर्शन चार–पाच वेळा घेता आले.

श्री बाबांच्या कृपेमुळेच दर महिन्यास श्री साईलीलेचा मराठी अंक माझेकडे बऱ्याच वर्षापासून येत आहे. तसेच शिर्डीहून उदी व प्रसाद दर महिन्यास येत असतो. माझे वय ह्यावेळी ७३ वर्षाचे आहे.

काहीं वर्षापासून माझ्या दोन्ही पायाच्या (Calcamid–Region) वर सुज आल्यांमुळे चालण्यास बराच त्रास होत होता. तेव्हां मी माझ्या दोन्ही पायाच्या (Calcamid Region) वर श्री साईबाबांची उदी चोळली. हा प्रयोग पंधरा वीस दिवस केल्यावर फिरायला जाण्यास सोईचे झाले.

उदी चोळून बरे वाटल्यास माझा अनुभव साईलीलेच्या मासीक अंकात छापण्याकरिता पाठवीन असे मी श्री साईबाबांच्या मूर्तीसमोर उभे राहून कबूल केल्या प्रमाणे हा माझा उदीचा अनुभव देत आहे.

# उदी साईंची अमृतधारा

—सौ. वर्षा विजय हजारे
सी।६, गुंफादर्शन, फर्स्ट कार्टर रोड,
बोरीवली पूर्व, मुंबई–४०० ०६६.

० "मनुष्य हा मातीमधून जन्माला येतो आणि शेवटी मृत्युनंतर तो मातीतच एकरूप होऊन जातो" हे मानवी आयुष्याचे शाश्वत आणि सत्य तत्त्वज्ञान प्रत्येक धर्माने सांगितले आहे. खिश्चन मुस्लिमांचे 'दफन' असो की जैन, बौद्ध आणि हिंदु धर्मीयांचे 'दहन' असो. मातीतून निर्माण झालेला हा देह मातीतच मिळायचा 'ह्या नश्वर देहाचे चोचले कशाला' हाच संदेश "सर्वधर्मसमभाव" आचरणात आणून आपल्या हयातीत आणि समाधीवस्थेनंतरही आपल्या लाखो भक्तांना त्याची कळत नकळत दीक्षा देणाऱ्या आपल्या साईपरमेश्वरांनी त्यांच्या 'उदी' मधून दिला आहे. पण बाबांच्या 'उदी'चे महात्म्य फक्त तेवढ्या पुरतेच मर्यादित नाहीं तर ......

बोरीवलीच्या महानगर साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आमच्या परिचयाच्या झालेल्या सौ. सुषमाताई कधी अस्वस्थता वाटली तर बाबांची उदी चिमुटभर कां होईना पण सरळ तोंडात टाकतात. त्यामुळे त्यांना स्वस्थता मिळते. मनःशांति मिळते. पूर्वी म्हणजे वीस बावीस वर्षांपूर्वी त्या एवढ्या साईमय झाल्या होत्या की 'साईंची उदी' हे त्यांचं आवडत खाद्य बनलं होतं. एकावेळी बरीचशी उदी खाणे आणि आपले शारिरीक, मानसिक भोग क्षणार्धात नाहीसे करणे त्यांना सहज शक्य होत होते. आमच्या सुषमाताईप्रमाणे आज असंख्य साईभक्तांना तो अनुभव आला असेल, येत असेल, आणि येत राहणारच. फक्त श्रद्धा, विश्वास हवा. 'बाबांची उदी' म्हणजे संजीवनी आहे हे जर अंतःकरणात बिंबले असेल तर कुणालाही तसा अनुभव आल्याशिवाय राहणार नाहीं. निदान आमच्या घरात तरी प्रत्येकाला त्याची प्रचिती येते. म्हणूनच काहीं वर्षांपूर्वी मी अचानक थंडगार पडले होते. मध्यरात्रीची वेळ. डॉक्टर वगैरेना बोलावण्याची आवश्यकता असूनही ते शक्य नव्हते. घरात होती तेवढी गरमनरम औषधे – बाम, अमृतांजन, वगैरे माझ्या यजमानांनी माझ्या अंगाला, तळव्याला हातापायाला चोळून अंगात उब आणण्याचा प्रयत्न केला. पण माझे अंगच एवढे गार पडले होते त्यात सर्वांग ताठ कडक झालेले ... घरात धावपळ करायला 'आम्ही दोन आमची दोन (आशिश–

कृपा) मुळे, ह्याशिवाय कुणी नाहीं. मला तर वाटले होते की "मी भरल्या संसारातून उठते अर्ध्यावरून" पाणावलेल्या डोळ्यांनी मी विजयकडे पहात होते पण त्यांची आणि माझीही बाबांवर त्यांच्या 'उदी'वर पूर्ण श्रद्धा होती. त्यांनी मला धीर दिला.

"बाबा आहेत आपल्या पाठीशी ... घाबरू नकोस" आणि 'बाबांची उदी'ची डबी उघडून त्यांनी बाबांच्या तसबिरीसमोर उभे राहून त्यांच्या आशिर्वाद देणाऱ्या हाताला लावली – जणू काहीं साईंच्या हातून घेतली, आणि माझ्या सर्वांगाला लावली ... काय झालं कुणास ठावूक ... मला गाढ झोप लागली आणि हळूहळू अंग पूर्ववत उबदार झाले. ... दुसऱ्या दिवशी मी जेव्हां डोळे उघडले तेव्हां विजयने सारे मला सांगितलेआणि मलाही क्षणभर आश्चर्यच वाटले. उदीचा हा चमत्कार म्हणजे खरोखरच विज्ञानाला लाजविणाराच होता. असे अनक प्रसंग आमच्या उभयतांच्या जीवनात आले. मुलांच्या आजारपणांतच नव्हे परीक्षा, पडझड शिवाय सांसारिक कटकटीतून सुद्धा आम्हांला तारलेय ते बाबांनी आणि त्यांच्या उदीनेंच! शारिरीक, मानसिक व्याधींवरील उपायाप्रमाणे आज देखील संधीवातानें कधीकधी हात पाय बोटे वगैरे दुखायला लागली की मरणप्राय: वेदना होतात. बाहेरून कुठलही औषध लावून त्या थांबत नाहींत त्यावेळी विजयच्या अत्याग्रहामुळे 'बाबांची उदी' मात्र त्यावर गुणकारी ठरते हे निर्विवाद! सकाळ– संध्याकाळ घराबाहेर पडताना 'उदी' कपाळावर आणि जीभेवर ठेवल्यामुळेच आपण सुखरूप परत येतो हे विजयप्रमाणे माझ्याही अनेकदां अनुभवास येते.

तसे पाहिले तर "प्रयत्नांती परमेश्वर" मानणारा माझा पिंड. तरीदेखील ऑफिसच्या परीक्षेला स्वत: जाताना अथवा नाटयप्रयोगाच्या वेळी यश मिळावं म्हणून 'उदी'चा वापर माझ्या हातून नकळत पण सर्रास केला जातो. रात्रीदेखील निद्रादेवीच्या कुशीत शिरण्यापूर्वी विजय स्वत: आमच्या सर्वांच्या भाळी उदी लावतात कारण काय असेल ते असो पण त्यामुळे सुखद स्वप्नसृष्टीचा कधीमधी बाबांच्या स्वप्निल दर्शनांचा आनंदमय अनुभव चाखता येतो हे काही कमी भाग्याचे नाहीं.

शेवटी आपण जिवंत हाडामासाची माणसे आहोत, यंत्रे नव्हेत. प्रत्येकाला मन–भावना आहेत. कधीमधी चुकूनमाकून एकमेकाला दुखवितो; नकळत का होईना नको ते करून बसतो. त्यावर उपाय म्हणजे बाबांजवळ प्रांजळ कबूली देवून त्यांच्या उदीप्रसादाने – प्राशनाने पुन्हा निर्मळ होणे हाच होय. ज्याप्रमाणे

अमृत प्राशनाने देवदानवही अमरत्वाने अजरामर झाले त्याप्रमाणे ह्या कलीयुगात आपणही 'बाबांच्या उदी' द्वारे साईमय होऊन आपल्या सुखदुःखांत समतोलपणा राखून सुख-समाधानाने 'माणूस' म्हणून जगू शकतो. फक्त श्रद्धा-अढळ श्रद्धा हवी. ...सबुरी - पूर्ण - भरपूर सबुरी हवी ...कारण श्रद्धेला परमेश्वर कधीच मरू देत नाही. ...सबुरी तर हवे ते आपणास देते. आणि साईची उदी जीवनातील वादळवारे संपवून आपणास बाबांच्या आपल्यावरील कृपेची क्षणोक्षणी प्रचिती अनुभूती आणून देते. म्हणूनच आमच्या साईची उदी म्हणजे सर्व शारिरीक, मानसिक, सांसारिक, व्यावहारिक, भावनिक वगैरे वगैरेंच्या सर्व आधी व्याधीवर रामबाण उपाय वाटतो, आणि मग आम्ही छातीठोकपणे सांगतो की "उदी साईची अमृतधारा".

★ ★ ★

# माझी मूळव्याध बरी केली

-श्री. विलास वि. सावंत
५।३२८ एम. एच. बी. कॉलनी,
मागठाणे, बोरीवली, मुंबई.

"नित्य मी जिवंत जाणा हेची सत्य
नित्य घ्या प्रचिती अनुभवे"

० मी श्रीसाईबाबांचा छोटासा भक्त असून गेल्या वर्षापासून मी नेहमीच श्रीसाईसच्चरिताचा एक अध्याय, त्याची पूजा, आरती तसेच त्यांच्या उदीचे सकाळ-संध्याकाळ प्राशन करीत आलोय. तसेच मी श्रीसाईलीलेचा वाचकही आहे. खरं म्हणजे मी माझा हा अनुभव यापूर्वीच श्रीसाईलीलामध्ये द्यावयास पाहिजे होता. परंतु मी ते पूर्ण विसरूनच गेलो. अर्थात श्रीसाईबाबांनी त्याची पुन्हां मला आठवण करून दिली. त्यांचं असं झालं. "मला गेल्या १०-१२ वर्षापासून मूळव्याधीचा (रक्ती) त्रास होत होता पण गेल्या ५-६ महिन्यापासून

मला त्यापासून फारच त्रास जाणवू लागला. रक्तस्त्राव थांबेचना. त्यावेळी मी श्रीसाईनाथांची अंतःकरणापासून प्रार्थना करून म्हटले की, मला तुमच्या उदी-प्रसादाने ताबडतोब बरं वाटू दे.आणि काय आश्चर्य! मला एका रात्रीतच उदीने बरं वाटलं. झालं माझं काम झालं. आणि माझा अनुभव मी काहीं दिला नाहीं. परंतु नंतर मला अचानक परत फारच त्रास होऊ लागला. एवढं की शेवटी मी के. ई. एम्. हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन करून घेतले. त्या मुदतीत मी नेहमीच उदी पाण्यातून घेत होतोच. परंतु तरी सुद्धा मला काहीं बर वाटलं नाहीं. मी नेहमीच श्रीसाईबाबांची प्रार्थना करत होतो की, मला या असाध्य दुखण्यातून लवकर बर करा. परंतु त्यांच्याच कृपेने मला एक आसामी भेटली त्याने मला एका दुकानातून औषध आणावयास सांगितले. तसेच दुसरेही औषध चालू ठेवलं. श्रीसाईबाबांची उदी घेणे, त्या भागाला लावण मी चालूच ठेवले होते. शेवटी मला आता चांगलं बरं वाटू लागलय. वरील औषध निमित्तमात्र मला श्री साईबाबांच्या उदीनेच बरं वाटलं.

दुसरा माझा अनुभव म्हणजे माझ्या सौभाग्यवतीच्या पोटामध्ये अतिशय दुखू लागलं. एवढं की तिला बसतासुद्धा येईना. शेवटी मी तिला श्रीसाईबाबांची उदी पाण्यातून देऊन प्रार्थना केली कीं, तिला ताबडतोब बरं वाटू दे. माझा अनुभव मीही श्रीसाईलीलामध्ये देईन तेही राहून गेल होतं. अशा अनेकवेळा मला श्रीसाईबाबांच्या उदीचा अनुभव आलेला आहे. अर्थात अशा वेळेला श्रद्धा आणि सबुरी हवी आहे. पण एवढं मात्र खरं आहे "जो जो मज भजे ।। जैसा जैसा भावे । तैसा तैसा पावे मी त्यासी ।। अशा माझ्या सद्गुरु श्रीसाईबाबांना माझी एकच प्रार्थना आहे की, त्यानी अशीच कृपा आमच्यावर आणि त्यांच्या असंख्य भक्तांवर ठेवावी.

शेवटी एकदा मी श्रीसाईबाबांना कोटी कोटी प्रणाम करून असे म्हणतो कीं,

**"म्हणोनी साईसमर्थ सद्गुरु । होऊनिया भवाब्धीचे तारू । आम्ही जे कास धरू । त्या सर्वांस उतरू पैलपार ।। मला दुस्तर हा भवार्णव । करा साईचरणांची नांव । दाविल निर्णय पैल ठाव । पहा नवलाव निष्ठेचा ।।**

★

# साईबाबांनी दृष्टी दिली

—कु. शुभांगी प्रभाकर पावसकर
एफ–२–२१ दक्षता कॉलनी,
भाभा हॉस्पिटल समोर, वांद्रा,
वांद्रा (पश्चिम), मुंबई ४०० ०५०

० मी एक साईबाबांची भक्त आहे. त्यांचेवर माझी अत्यंत निष्ठा आहे. मी नेहमी बाबांचा धावा करीत असते.

माझी आई माझ्या भाच्याला (भावाच्या मुलाला) घेऊन बसली होती, आणि माझ्या भाच्याने गंमत करता करता त्याच्या हाताची बोटे तिच्या डोळ्यात गेली, व माझ्या आईचा डोळा सुजून लालभडक झाला. दुसऱ्या दिवशी तर तिला दिसेनासेच झाले. मला तर पार रडूच कोसळले. मग मला आधार कुणाचा माझ्या बाबांचाच, मी सकाळी कामावर जाताना आईला म्हटले की तू डोळ्याला बाबांची उदी लाव, व मनात म्हटले की बाबा माझ्या आईचा डोळा बरा होऊ दे मी माझा अनुभव साईलीला या मासिकात प्रसिद्ध करीन.

संध्याकाळी मी ४।। वाजता घरी परतले. तेव्हां आईला म्हटले आई ग तुझा डोळा आता कसा आहे; तेव्हां ती म्हणाली की वेदना कमी झाल्या व आता मला स्पष्ट दिसू लागले आहे. मी आईला म्हणाले बघ ही सर्व माझ्या बाबांचीच कृपा.

बाबा तुम्ही माझ्या हाकेला सदैव धाव घेता. परंतु मी माझा तुम्हांला दिलेला शब्द मात्र पाळू शकले नाहीं. मी किती कृतघ्न आहे. मी तुम्हांला कबूल केले होते की, माझ्या आईचा डोळा बरा झाला तर मी साईलीला मासिकात हा लेख देईन.

माझ्या भक्ताचा आर्तस्वर ऐकून मी त्यांचे दुःख निवारण करण्याकरिता धावून आल्याशिवाय कदापि रहाणार नाहीं.

अशा प्रकारे माझ्या हाकेला सदैव ओ देणाऱ्या कृपाळू साईमाऊलीला माझे शतशः कोटी कोटी प्रणाम!

# नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य

—श्री. पुंडलिक दामोदर सोनावणे
रामलाल चाळ, ६–१५,
ग्रँटरोड, (पश्चिम) मुंबई ७.

० जानेवारी १९८३ ची हकिगत, आमच्या मातोश्री सौ. भागीरथीबाई वय ६०. यांच्या अंगावर व तोंडावर लाल व पांढरे डाग दिसू लागले होते. प्रथम आम्हांला वाटले होते की काहीतरी धावर वगैरे असेल परंतु राहवले गेले नाहीं, आम्हीं कातडी स्पेशालिस्टकडे गेलो त्यांनी तपासले व आईच्या डागांचे फार मोठा रोग (लेप्रसी) सांगितला. ह्याबद्दल मी व माझा लहान भाऊ श्री. राजाराम आम्हां दोघानांच माहित होते. घरातील व आईस कुणालाच ह्याचा पत्ता लागू दिला नाहीं. आम्हां दोघा भावांचा चेहरा फार केविलवाणा झाला, की कोणते आम्ही एवढे पाप केले होते की ज्याची शिक्षा आमच्या आईला मिळतेय. पण नाहीं, घरातील बाबांना नवस केला, की माझे साईमाऊली तुमचा साईचरित्र ग्रंथ वाचून पूर्ण करीन तोपर्यंत मी दाढी, केस काहींच करणार नाहीं. ग्रंथ संपवयाच्या आत आईच्या अंगावर कोणताही डाग रहाता कामा नये, आणि खरोखरच ग्रंथ् संपला आणि आईच्या अंगावर साधा डाग सुद्धा दिसला नाहीं. काय हा चमत्कार! हे सर्व बाबांच्या उदीची व त्यांच्या आशिर्वादाची कृपा. नंतर मी शिरडीला जाऊन नवस पूर्ण केला, व दाढी केस काढून बाबांच्या समाधी वर वाहून विहिरीत टाकले तेव्हां पासून घरातील सर्व लहान थोर कंपनी बाबांची सेवा करतात व दर गुरुवारी बाबांच्या मूर्तीला स्नान घालून तिर्थ प्राशन करतात असे हे आमचे दैवत.

# उदी म्हणजे साक्षात् धन्वतरी

—सौ. कुमुदिनी यशवन्त टिळक.
१२, "साईकृपा" विष्णू नगर,
गुप्ते रोड, डॉ. चौधरी हॉस्पिटल
समोर, डोंबिवली ४२१ २०२.

० एके दिवशी चार जिने चढल्याचे निमित्त होऊन माझा डावा पाय एकाएकी खूप दुखू लागला. मला जिने उतरता येत नव्हते, व चालता तर मुळीच येत नव्हते. सतत ठणका लागलेला होता. कुणी विचारले तर मी पाय मुरगळल्याचे सांगत होते. काय झाले मलाच माहित नव्हते. कुठे पडले नव्हते, काही नाहीं, डॉक्टर झाले, दुःख दबाव लेप झाला. इंजेक्शने झाली. पण पाय दुखावयाचा थांबत नव्हता. मुलांनी श्री "मल्लिकार्जुन श्री शैल्यची" तिकीटे काढून आणली होती. पाय तर असा धरलेला. जाणार कशी? ह्यातून मला वाचविणारा परमेश्वर माझ्या एकदम लक्षात आले. की बाबांची एवढी महत्त्वाची "उदी" घरात असताना आपण डॉक्टर व औषधे कशाला घेतो. मी बाबांची प्रार्थना केली. तुम्हीच मला "मल्लिकार्जुनाचे" दर्शन घडवून आणणार. मला तुमच्या वाचून कोण आहे? तुम्हीच माझे डॉक्टर. असे म्हणून मी उदीचा जाडसर थर पायाला लावला. पोटात घेतली. तर काय आश्चर्य! १५ दिवस जो मी पाय धरून होते. तो एका दिवसात उदीने बरा झाला. बाबांचे सांगणे पण हेच असते.

**शरण मज आला, आणि वाया गेला। दाखवा दाखवा ऐसा कोणी ।**
**जो जो मज भजे, जैसा जैसा भावे। तैसा तैसा पावे मी ही त्यासी ।**

असाच दुसरा अनुभव मला आला. माझा नंबर २ चा मुलगा जयंत एके दिवशी रात्री १० वाजता पोटात खूप दुखते म्हणून अत्यंत विव्हळू लागला. मला काही सुचेना. एवढ्या रात्री मी काय करू? घरात ओवा, सुंठ, संपलेले होते. तो तर मोठ्याने पोट दुखते दुखते म्हणून ओरडत होता व मला ओवा देण्यास पुन्हां पुन्हां सांगत होता. मी व तो दोघेही बेचैन झालो. घरात अगदी थोडी सुंठ होती. त्याची पूड करून गुळात व तुपात घालून दिली व त्याला झोपावयास सांगितले. परंतु तो ओरडतच होता पोट दुखते म्हणून. मनात आले बरे झाले आपण डॉ. चौधरी हॉस्पिटलसमोर रहातो म्हणून गरज पडल्यास जाता येईल. परंतु तेवढ्यातच माझ्या एकदम "उदीची" आठवण झाली. व बाबांची प्रार्थना करून पाण्यामध्ये "उदी" घालून घट्टच प्यायला दिली. पोटाला लावली कपाळाला

लावली व बघ तुला एकदम बरे वाटेल म्हणून सांगितले. प्रथम तो माती पोटात जाईल म्हणून घेण्यास तयार नव्हता पण मी बळजबरीने 'उदी' पाजली तो काय आश्चर्य! तो जो विव्हळत होता तो एकदम थांबला व शांत झोपी गेला. असा आहे हा उदीचा चमत्कार. 'उदी' म्हणजे साक्षात् धन्वतरीच.

**"जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव"**

---

# डॉ. अ. का. पाठक यांचे अभिनंदन

श्रीसाईलीलाचे एक मान्यवर व गुणी लेखक डॉ. अ. का. पाठक बी. एससी (ऑनर्स), एम. एड. पी. एच. डी. गोरेगांव, मुंबई यांना मुंबईतील ज्योतिर्विद्यालयातर्फे 'ज्योतिषालंकार' ही सन्माननीय व सर्वोच्च पदवी बहाल करण्यात आली आहे. ज्योतिषाशास्त्रातील अंकशास्त्रात केलेल्या विशेष संशोधनाबद्दल ही पदवी मिळालेली असून ही पदवी घेतलेले ते यंदाच्या वर्षीचे एकमेव उमेदवार होत.

डॉ. पाठक हे शासकीय महाविद्यालय, पनवेल येथे उप-प्राचार्य या पदावर असून एकावेळी ते नवशक्ति दैनिकातून रविवारी साप्ताहिक भविष्य हे सदर लिहित असत. समग्र सावरकर साहित्याचा अभ्यास करून विद्यार्थी व तरुणांसाठी त्यांनी सावरकर स्मृती दर्शनाच्या कॅसेटस् तयार केलेल्या आहेत व त्यांची मुक्तकंठाने प्रशंसा महाराष्ट्रातील नियतकालिकांनीही केलेली आहे. त्यांनी लिहिलेल्या 'विज्ञानाचे अध्यापन' या पुस्तकास ३०० रु. चे पारितोषिकही प्राप्त झालेले आहे.

डॉ. पाठक यांच्या विविध कार्याचे आम्ही कौतुक करून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो.

# विभूती हेच महागुणी औषध

—श्री. नारायण रा. चोरगे
४७—७ सोनावाला बिल्डिंग,
सी. पी. टॅंक रोड,
मुंबई नं. ४०० ००४.

० मी माझ्या लीलेची व्यथा देत आहे. माझ्या अचानक पोटात दुखू लागले. फारच वेदना होऊ लागल्या. माझे आई—वडील गावचे कायम रहिवासी मग सांगावे कोणाला? पोट दुखु लागले की जरा पोट धरायचे असे करता करता दोन दिवस काढले. नंतर नाईलाज म्हणून कोणाला तरी सांगावे म्हणून शेजारच्या मित्राला सांगितले तर तो म्हणाला की, गावच्या अवजड कामामुळे पोटात नळ भरलेत. तर ते रोज पहाटे उठण्यापूर्वी मळले पाहिजेत व ज्यांना अनुभव असेल तोच मळील. तर माझ्या गावचे गृहस्थ ज्यांना अनुभव असलेले त्या गावी जा. पण नंतर त्या मित्रानेच सांगितले की मी मालीश करीन. त्यानेच स्वत: पहाटे उठून पोटाचे मालिश केले. तरी पण अधून मधून वेदना व्हायच्याच मग मनात विचार आले, डॉक्टरला दाखवून औषध घेतले पाहिजे डॉक्टरकडे संध्याकाळी जायचे नक्की केले. पण कामावर गेल्यावर काम करत असतांना अचानक विचार आले बाबांचे असणारे महागुणी औषध का घेत नाहीं. ताबडतोब विभूती थोडी पाण्यात खाल्ली व पोटाला लावली. असे दोन दिवस केले, व मनात म्हटले, जर आराम वाटला तर साईलीलेत देईन. काही वेळांतच आराम वाटू लागला पण माझे दुर्लक्ष म्हणा पाच महिन्याने पुन्हा दुखू लागले व डॉक्टरकडे गेलो. तर डॉक्टरने तेच सांगितले दहा दिवस औषध घ्या. औषध चालू केले. तर फरक काहींच वाटेना. बाबांची विनंतीकरून माझी चुकी झाली माफी मागतो व हे विभूती औषध घेतो. असेच म्हणून पाण्यात खाल्ली व पोटाला लावली. व आजच लिहून साईलीलेत देईन असे म्हटले व एक दिवसात आराम वाटू लागला. असे आहेत बाबा. बाबांनी मला आशिर्वाद दिल्याबद्दल श्रीसाई सद्गुरु चरणी पुन्हां पुन्हां नमस्कार

★ ★ ★

# विज्ञान युगात उदीची प्रचिती

—सौ. उषा प्रभाकर मुळे
१६० नारायण पेठ, पुणे ३९.

० श्री साईसच्चरितात श्री. साईबाबांचे बोल आहेत —

करिता माझिया कथांचे श्रवण
तयांचे कीर्तन आणि चिंतन ।
होईल मभ्दक्तीचे जनन ।
अविदया निरसन रोकडे ।
जेथे भक्ति श्रद्धान्वित ।
तयाचा मी नित्यांकित ।

या श्री साईबाबांच्या बोलाचे प्रत्यंतर मला दि. १९—१२—८३ दत्तजयंती या दिवशी उदीवर कसे आले, त्याची ही सत्य विज्ञान युगातील घटना आहे.

शिर्डीला मी १६—१७ वर्षे साईनाथ माध्यमिक विद्यालयात शिक्षिका होते. त्यामुळे श्री साईबाबांची सेवा त्यांनी करवून घेतली. श्री साईसच्चरित्राचे पारायण द्वारका माईत मी नेहमी करीत होते. परंतु सध्या सेवानिवृत्त झाल्यावर पुणे येथे दत्तजयंतीच्या आधी तीन दिवस श्री साईसच्चरित्राचे पारायण केले व दत्तजयंतीला समाप्ती केली, त्या दिवशी रात्री श्री साईबाबांचा फोटो पुढे एका वाटीत उदी भरून (अगदी सपाट अशी) ठेवली व प्रार्थना केली 'बाबा' आपली काही प्रचिती, आशिर्वाद द्या. दुसरे काहीही मागणे नाहीं फक्त आशिर्वाद.

आणि श्री साईबाबांचा आशिर्वाद फलश्रुत झाला. सकाळी उठून नमस्कार करावयास गेले आणि आश्चर्य उदीच्या वाटीवर अंगठ्याचा हुबेहूब आकार अगदी रेषासुद्धा उमटलेल्या पाहिल्या मन गहिवरून आले. मस्तक नम्र झाले.

श्री साईबाबा भक्तांना आपल्या उजव्या हाताच्या अंगठ्यानी उदी कपाळाला लावित होते व तोच हात डोक्यावर ठेवून आशिर्वाद देत होते. उदीची चिमूट त्यांनी कधीही लावली नाहीं. ही हकीगत शिर्डीत राहणारे श्री साईबाबांना पाहिलेले श्री. बाप्पाजी रत्नपारखी मला नेहमी सांगत होते. श्री. साईबाबांचा हा प्रसादरूपी अंगठ्याचा रंगीत फोटो काढला आहे. १० व्या लेखक—कवी संमेलनात तो आणला होता, परंतु त्याची प्रसिद्धि करू नये असे वाटले.

अशी ही श्री साईबाबांची अदभूत किमया किती ती पाहून मस्तक नम्र होते.

श्रीसाईचरणी प्रणाम.

☆

# प्रेमस्वरुप साईमाऊली

—सौ. मालती एन. रेगे
ए-९, श्री ओजस को. सो. कोलडोंगरी
रोड नंबर २, अंधेरी (पूर्व) मुंबई ६९.

० दिनांक १२–४–८२ ची संध्याकाळ होती. मी व माझा वडील भाऊ घरी येत होतो. रस्त्यातच मी पडले. माझा संपूर्ण भार माझ्या उजव्या हातावर पडला व हाताला असह्य वेदना होऊ लागल्या. घरी येताच प्रथम श्री बाबांची उदी हाताला लावून चिमूट भर पाण्याबरोबर पोटात घेतली. हाताला बर्फाने शेकले. रात्र कशीबशी श्री बाबांच्या जपात संपली. सकाळी उदी लाऊन एक्सरे काढण्यास गेले.[कारण हात फारच सुजला होता. संध्याकाळी एक्सरेत हाताच्या कोपऱ्याच्या हाडाला चीर (क्रॅक) गेलेली दिसली. ऑर्थोपेडीक सर्जनकडे जाणे प्राप्त होते. उदी लाऊन श्री बाबांचा जप करीत हॉस्पिटलमध्ये बसले. तोपर्यंत अर्थातच हात गळयात अडकवला होता. डॉक्टरांनी टेबलवर मला घेतले, व गळयातील हात सोडवून वर करण्यास सांगितले. हात डॉक्टरांनी गच्च धरला होता. पण काय आश्चर्य! जो हात जरासा हलवला तरी असह्य वेदना होत होत्या, तोच हात वर, खाली सर्व दिशेला फिरवला तरी दुखला नाहीं, व लगेच डॉक्टर म्हणाले, "वा! प्लॅस्टरची तर गरजच नाही, १५ दिवस हात गळयात ठेवा व जड उचलू नका." इतका आनंद झाला की माझी आईच "साईमाऊली"च माझ्यासाठी धावून आली आता माझा हात पूर्ण बरा असून जड वजनसुद्धा उचलू शकते. हीच श्रीसाई माऊलीचीच अगाध लीला म्हणायची नाहीं तर काय? अशा या माझ्या साईमाऊलीला माझे लाख लाख प्रणाम. ❁

---

## इनामदार—लेले शुभविवाह

मुंबापुरीतील एक निष्ठावान साईभक्त श्री. जी. आर. इनामदार यांचे चिरंजीव श्री. रविंद्र यांचा शुभविवाह कै. सदाशिवराव लेले गिरगाव मुंबई यांची कन्या चि. सौ. कां. ज्योती इजबरोबर रविवार दि. १५–४–८४ रोजी दादर शिवाजी पार्क येथील भारत स्काऊटस् अँड गाइडस पॅव्हिलियन हॉल येथे मोठ्या थाटाने पार पडला. वधूवरांना शुभाशिष प्रदान करण्यासाठी विविध बँकांमधील अधिकारीवर्ग आणि निरनिराळ्या क्षेत्रातील नामवंत मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

आम्हीही वधूवरांना शुभाशिष प्रदान करून सुखाचा संसार चिंतितो.

# कुत्रा पण बरा झाला

–श्री. अवधूत ज्ञानेश्वर पोतदार
'मातृगंगा', १२५, गजानन हौ. सोसायटी,
स्टेशन रोड, कराड, जि. सातारा.

० २५ फेब्रुवारी १९८४ चे रात्रीचे नऊ वाजले होते. आम्ही सर्वजण घरात गप्पा मारत होतो. इतक्यात शेजारच्या योगेशने मला हाक मारली. मी दार उघडून बाहेर गेलो तर आमचा कुत्रा टॉमी केविलवाण्या स्थितीत ओरडत होता. गोल गोल फिरत होता व तोल जाऊन पडत होता. मी जवळ गेलो तर त्याच्या पायाला काहीतरी चावले होते. जखमेतून रक्त येत होते, आम्ही सर्वजण घाबरलो जनावरांचा दवाखाना तर घरापासून तीन मैल लांब होता, आणि तो तर साडे आठ वाजता बंद होत असे. यातच घरी वडील नव्हते. तो पर्यंत आम्ही त्याच्या पायाला (जखमेला) हळद व मलम लावले पण तो ते चाटत असे. त्याचे ओरडणे अजूनही बंद झाले नव्हते. इतक्यात मला साईबाबांच्या उदीची आठवण झाली. मी उदी त्याच्या जखमेवर व कपाळावर लावली व म्हणालो साईबाबा, टॉमीला बरे करा, मी हा अनुभव साईलीलाकडे देईन, आणि काय गंमत, त्याचे दुखणे, पंधरा वीस मिनिटात बंद झाले.

थोड्या वेळातच वडील आले त्यांना हे समजले व त्यांनी डॉक्टरांना बोलावून आणले. डॉक्टरांनी त्याला दोन इंजेक्शने दिली. त्याने हूं की चूं केले नाही. तो सकाळपर्यंत बरा झाला. खरे तर उदीमुळे त्याला बरे वाटले होते. असा आहे उदीचा महिमा.

भक्तांच्या हाकेला धावून येणाऱ्या साईबाबांना माझे शतशः प्रणाम.

# उदीने निद्रानाश दूर झाला

—सौ. सु. र. हट्टाळकर
१९९, 'सुनिता सदन,'
चेंदणी, कोळीवाडा, ठाणे.

० सात–आठ महिन्यापूर्वीची गोष्ट. आमची धुणी–भांडी करणारी मोलकरीण अचानक येईनाशी झाली. आज येईल, उद्या येईल करता करता जवळ जवळ महिना गेला तरी तिचा पत्ता नाहीं. शेवटी नवीन मोलकरीण ठेवली. महिनाभर मोलकरीण नसल्याकारणाने माझ्यावर कामाचा अत्यंत ताण पडला. घरी धुण्या-भांड्यासहित सर्व कामे व ऑफिसमधेही अतिशय काम. यामुळे कीकाय कोणजाणे मला अचानक झोप येईनाशी झाली. ८–१५ दिवस वाट पाहून अखेर डॉक्टरांचे औषध चालू केले. औषध चालू असेपर्यंत झोप यायची पण डॉक्टरांनी गोळ्यांचे प्रमाण कमी केले की पुन्हां झोप येईनाशी व्हायची. अखेर होमिओपॅथिच्या डॉक्टरांचे औषध चालू केले. पुनः तोच प्रकार त्यांनी दिलेल्या प्रमाणात औषध घेत होते तोपर्यंत निदान ४–५ तास झोप लागायची. पण महिनाभरा नंतर त्यांनी औषधाचा डोस कमी केला आणि पुनः झोप येईनाशी झाली. ८–१५ दिवस वाट पाहिली पण झोप सुरळित व्हायची काहीं लक्षणे दिसेनात. झोपेसाठी कायम औषध घेत राहणेही योग्य वाटत नव्हते. दिवसभर ऑफिसमध्ये भरपूर काम व रात्री झोप नाहीं, त्यामुळे खूप थकवा जाणवायचा. जीव अगदी वैतागून गेला होता. काहीं सूचत नव्हते.

मी साईबाबांच्या फोटोकडे पहात रहायची. तेव्हां मनात आले की बाबांच्या उदीचाच औषध म्हणून उपयोग करून पहावा. मग बाबांना सांगितले की, 'बाबा, मला तुमच्या उदीने झोप येऊ दे. मला रजा मिळताच मी आपल्या दर्शनाला शिरडीला येईन. उदी घ्यायला सुरवात केली. थोडा गुण वाटू लागला. औषध चालच होते.

मुलाची बी. कॉम. ची परीक्षा आटोपली होती, व मे अखेर मला रजा मिळाली. पण अजूनही शिरडीला जाण्याचा योग येत नव्हता. मला एल. जी. एस. च्या परीक्षेस बसावयाचे होते, व त्याचे वर्ग चालू झाले होते. अखेर एका शनिवारी वर्ग नव्हता असे कळल्यावरून आम्ही लगेच शिरडीला जाण्याचा बेत केला.

३ जुलैला सकाळी मी मुले व बहिण यांना घेऊन शिरडीला निघाले. दुपारी तेथे पोचताच सामान लॉकअपमध्ये ठेवले. कारण खोली मिळायला वेळ लागणार होता. प्रथम हातपाय धुतले व साईबाबांचे मनसोक्त दर्शन घेतले आणि आमचा श्रमपरिहार झाला. पण अचानक मुलीची तब्येत बिघडली. बाबांच्या कृपेने डॉक्टर लगेच भेटले व त्यांनी तिला इंजेक्शन व औषध दिले. रात्रभर विश्रांती घेताच दुसऱ्या दिवशी ती खडखडीत बरी झाली. त्या रात्री मुलीला खोलीवरच ठेऊन आम्ही साईंच्या नवीन भोजनगृहात जेवलो. तिला थोडा प्रसाद दिला. मुलीला खोलीवरच ठेऊन आम्ही साईमंदिरात गेलो. बाबांचे दर्शन घेतले. आरती झाली. नंतरचे कार्यक्रमही मनसोक्त ऐकले. सनई व मृदुंग यांची जुगलबंदी तर फारच श्रवणीय होती. बाबांच्या सहवासात तर हे वाद्यसंगीत भान हरपवून टाकत होते. कान तृप्त होत होते. डोळे मिटून जात होते. असेच रात्रभर ऐकत बसावे असे वाटत होते. पण थोड्यावेळाने लक्षात आले की मुलगी खोलीवर एकटीच आहे. आता परतायला हवे म्हणून अखेर पुनः एकदा बाबांचे मनसोक्त दर्शन घेतले. उदी, प्रसाद घेतला व खोलीवर परतलो. झोप लागेल की नाहीं ही चिंता होतीच. पण बाबांची उदी पाण्यातून घेतली. बाबांचे स्मरण केले व म्हटले की 'बाबा कबूल केल्याप्रमाणे तुमच्या दर्शनाला आले आहे. तेव्हां आता हा निद्रानाशाचा विकार कायमचा जाऊ द्या.

अन् काय आश्चर्य! त्या रात्री खरोखरच गाढ झोप लागली. पहाटे साई-मंदिरातील घंटा काकड आरतीची सूचना देऊ लागली तेव्हा मला जाग आली. त्यावेळेपासून आजतागायत मला झोपेसाठी औषध घ्यावे लागले नाहीं. गेले सात आठ महिने भोगत असलेला त्रास अखेर बाबांच्या दर्शनाने संपुष्टात आला. माझी झोप पुनः ठिकाणावर आली.

बाबांच्या वर श्रद्धा ठेवून केलेले कोणतेही काम वाया जात नाहीं हेच खरं.

★

# साई तुझी लीला अपरंपार

—श्री. डी. एन्. कुलकर्णी
ढगे चाळ, खोली नं. १८,
वेतूरकर पाडा, कल्याण,

० आमची दहा महिन्याची मुलगी परवा दिपवाळीनंतर आम्ही सर्व गावा-कडून येत असताना रेल्वेतच संडासने अक्षरशः बेजार होवून गेली. त्यादिवशी यायला रात्र झाल्याने दुसरे दिवशी सकाळीच डॉक्टरकडे नेले व औषध सुरू केले. तसेच नेहमीप्रमाणे उदी तर सकाळ संध्याकाळ आम्ही लावितच असतो.

दोन दिवसानंतर शौचाचे थोडे कमी झाले तर उलट्या सुरू झाल्या. दोन दिवसापासून तिला खायला तर द्यायचे टाळलेलेच होते. फक्त साबुदाणा पेज किंवा कोरी कॉफी व आरारोट पावडरची पेज अशाच गोष्टी देत होतो. त्याही उलट्या होवू लागल्याने निरुपयोगी ठरू लागल्या.

इतके लहान मूल' पोटात २ दिवसापासून काही नाहीं म्हणून खूपच रडू लागले (जे नेहमी हसत खेळत असते) तेव्हां आम्हाला काय करावे सुचेना! डॉक्टरांचे म्हणणे की, औषधाचा परिणाम दिसण्यासाठी (उलट्या बंद होण्या-साठी) २ दिवसांचा अवधी लागेल. मुलीच्या तर पोटात काहीच ठरत नव्हते. शेवटी सौ. ने शेवटचा उपाय म्हणून बाबांची उदी साबुदाण्याच्या पेजेमध्ये मिस-ळली व ती पेज मुलीला खाऊ घातली. रडणारी मुलगी थांबली व त्या क्षणा-पासून उलटी कोठल्या कोठे पळून गेली! आम्हा उभयतांच्या डोळ्यातून आनंदाश्रू आले. खरच पुन्हा एकदा साईचमत्कार अनुभवास आला! असेच सर्व भक्तांच्या संकटप्रसंगी साईबाबा धावून यावेत हीच साईचरणी प्रार्थना!

❀

# श्रद्धा आणि सबुरी यांचा अपूर्व अनुभव

—सौ. शिलाबेन जगन्नाथ पाटील
मु. पो. सातपुडा तापी परिसर
सहकारी साखर कारखाना,
स्टोअर विभाग, पुरुषोत्तम नगर,
ता. शहादा, जि. धुळे.

० गेल्या सप्टेंबर १९८३ मध्ये माझ्या लहान बहिणीला (उमा) रेखाला बाबांच्या कृपेने मुलगा झाला. तो दिवस गणेश चतुर्थीचा असल्यामुळे त्याचे नाव गणेश असे ठेवण्यात आले. जन्मल्या नंतर तीन दिवसांनी त्याच्या डोक्यावर मेंदूच्या भागावर एक मऊ अशी गांठ दिसायला लागली व हां हां म्हणता ती ४।५ दिवसात बरीच मोठी झाली. मेंदूवर असल्यामुळे माझे आई वडील व तिच्या सासुरवाडच्या मंडळींना चिंता वाटू लागली. शेवटी डॉक्टरला दाखविले. डॉक्टरने इंजेक्शन दोन–तीन दिवसपर्यंत देऊनही उपयोग झाला नाही म्हणून त्याने ऑपरेशन करायचे सांगितले व ठरलेही. मग तर अधिकच भयभीत वातावरण निर्माण झाले. गाठ मोठी झाल्यापासून, आम्हांला उदीची आठवण असल्यामुळे श्रद्धेने रोज गांठीवर उदी लावून तिचे बारीक दोन–तीन कण त्याच्या औषधीमध्ये टाकून त्याला पाजून देऊ लागलो. डॉक्टर गावी निघून गेल्यामुळे ऑपरेशनचा दिवस लांबून गेला. आम्ही मात्र श्रद्धेने रोज उदीचा नित्य क्रम चालूच ठेवला. शेवटी उदी लावणे हेच ऑपरेशन ठरले, आणि काय आश्चर्य १०।१२ दिवसात ती गाठ एकदम चार आणे कमी झालेली दिसू लागली, व नंतर चार पाच दिवसांत संपूर्ण कमी होऊन त्या जागेवर काहींही दिसेनासे झाले. आम्हां सर्वांच्या डोळ्या समोर शिर्डी येथील समाधी मंदिरातील बाबांची मूर्ती दिसू लागली. आम्ही सर्वांनी बाबांना नमस्कार केला व दरवर्षाप्रमाणे यंदाही जानेवारी १९८४ मध्ये ता. २६ ते २९ पर्यंत तेथे राहण्याचा निश्चय केला. श्रीसाईबाबांच्या उपकाराची परत फेड म्हणून यंदा गणेशला व त्याच्या आई वडीलांना सुद्धा दर्शनासाठी घेऊन जाण्याचे निश्चित केले. अशा आमच्या समर्थ साईबाबांना आम्हां सर्वांचे कोटी कोटी प्रणाम.

असा आहे आमचा श्रद्धा आणि सबुरी यांचा अपूर्व अनुभव.

# म्हशीवरसुद्धा उदी वापरली !

–श्री. देवेंद्रसिंह भगवानसिंह जमादार
मु. पो. थाळनेर, ता. शिरपूर जि. धुळे

० आमच्या जवळ एक म्हैस होती तिच्या दुध काढण्याचे जागेवर गाठ झाली होती. दररोज गुराच्या डॉ.कडे पाठवित होतो, डॉ. मलम पट्टी लावून पाठवित. २।३ दिवस डॉ. कडे पाठविली. डॉ. ने ऑपरेशन करण्यास सांगितले. मी आमच्या गुराख्याला सांगितले आता डॉ कडे नेवू नको ही बाबांची 'उदी' त्या गाठीवर लाव. संध्याकाळी बाबांना प्रार्थना केली. म्हशीची गाठ चांगली केली तर ११।– रुपये प्रसाद म्हणून पाठवेन ४।५ दिवसात आठवण आली गुराख्याला विचारले, आता म्हशीची गाठ कशी आहे. त्याने सांगितले आता चांगली आहे. विना ऑपरेशन गाठ बसली, फक्त बाबांच्या उदीचा हा चमत्कार म्हणा.

मी आणखीन एक नवी म्हैस घेतली ३५००।– रुपयाला, घरी आणल्यावर १।२ दिवस तिने दुध दिले नंतर देत नव्हती. कुणालाही जवळ येवू देत नव्हती. १।२ दिवस तिने त्रास दिला. आमचे तर होश उडाले. कोणी सांगत होते परत करा कोणी सांगत होते म्हैस बरोबर नाहीं. पण माझी हिंमत परत करण्याची होत नव्हती. कारण की म्हैस मी गुरुवारी घेतली व बाबांचे नाव घेवून घेतली, व त्या दिवशी सांगितले की म्हैस चांगली निघाली आणि दुध बरोबर द्यायला लागली तर डेअरीचे पहिले पैसे मी बाबांना पाठविन. त्याप्रमाणे म्हशीला उदी लावली आणि आश्चर्य म्हैस नेहमीप्रमाणे दुध द्यायला लागली.

आमच्यावर श्री बाबांची सदैव अशीच कृपा राहो.

☆

# साईमाऊली बाबांच्या उदीचे चमत्कार

—सौ. हिराबाई कृ. अनारडी
हिरा–कृष्ण सदन, उल्हासनगर,
ठाणे

० श्री. साईबाबां विषयी श्री साईलीलामध्ये लिहिण्याचे माझ्या मनात फार दिवसापासून होते. श्रीसाईलीला अंक मी श्रद्धेने आणि आवडीने वाचते. साई-बाबांच्या विभूतिप्रसादाचे मला प्रत्यक्ष चमत्कारिक अनुभव आलेला असा –

मे २८ स. १९८२ त्या दिवशी माझ्या मुलाचा साखरपुडा खडकी येथे आयोजित साईकृपेनेच होता. तो दिवस शुक्रवार आम्ही सकाळी ११ च्या कर्जत लोकलने उल्हासनगरहून कर्जतला पोहचलो नंतर तेथून मनमाड पॅसेंजर पकडली. पण गाडीत चढण्यास जागाच नव्हती. कसेही करून गाडीत चढलो. मला तर उभे राहायला जागाच नव्हती तरी कसेबसे करून उभी राहिले. काहीं बाया भांडत ोत्या माझी चप्पल त्या बाईच्या सामानाखाली राहिली. एका माणसाने तर फारच धांदल केली व आमच्या बरोबर असणाऱ्या माणसाशी मुलाशी भांडायला लागला. मी तर फारच घाबरले बाबांचा धावा सुरू केला तसा तो शांत झाला आणि साईच्याच कृपेने तोही घाबरला आणि तळेगाव स्टेशन आल्यावर मागच्या बाजूने उतरून पळून गेला. पुढे खडकीला पोहोचल्यावर मुलीच्या घरी साखरपुडयाची तयारी चालली होती. ६ वाजता एकदम ढग भरून आले विजा चमकू लागल्या. त्या काळया ढगाकडे पाहून आम्ही दोन्हीकडची माणसं एकदम घाबरून गेलो काय करावे सुचेचना इतक्यात माझ्या छोटया मुलाने उल्हासनगरहून निघताना बाबांची पूजा झाल्यावर बाबांची उदी बरोबर घेतली होती. त्याने हा प्रकार पाहिल्यावर सगळयांची धांदल उडालेली पाहिली त्याला एकदम बाबांची उदी आणलेली आठवली व मला नकळतच उदी हातावर बाबांचे नाव घेऊन साई तूच मदत कर असे म्हणून जोराने ती ढगाच्या दिशेने फुंकली त्याबरोबर बाबांचा चमत्कार झाला. वारा जोराने सुटलाच वाऱ्याच्या जोराने सगळे काळे ढग निघून गेले व आकाश स्वच्छ निरभ्र झाले. नंतर बाबांच्या कृपेनेच आशिर्वादाने आमचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रम झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी आमच्या लोकात चर्चा सुरू झाली तेव्हां माझ्या छोटया मुलाने हा बाबांचा चमत्कार असे सांगितले. मुलाचे लग्न झाल्यावर २८ जून १९८३ ला मला अचानक स्कूटरवर बसलेल्या एका मुलाने धडक दिल्यावर मी लांब फेकले गेले. माझ्या पायाला मार बसला.

पण मी त्या मुलाला काहीं ओरडले नाहीं व इतर लोकांना सांगितले की त्या मुलाला कोणी मारू नका अगर हातही लावू नका पोलिस हवालदार आले, व म्हणाले बाई या मुलावर केस करा व त्याच्याकडून खर्च भरून घ्या. मुलाला पोलिसांनी ताब्यात घेतले पण मी म्हणाले, "की, मला त्या मुलावर काहीं करायचे नाहीं त्याला सोडून द्या. त्याला सोडवून मी घरी आले त्यावेळी श्री साईनाथ बाबांनी मला घरापर्यंत सोडले. घरी आल्यावर घरचा इलाज आंबाहळदी लावले पण उपयोग झाला नाहीं. पाय बरा होईना सूज उतरेना. मला डॉ. नी सांगितले की पाय फ्रॅक्चर झाला प्लास्टर केले तर ते बरोबर झाले नाहीं. परत दुसरे केले तीन महिने झाले पण पाय बरा होईना. मग बाबांची उदी मी नित्य नियमाने लावते आता पायाची सूज कमी आहे व थोडे चालताही येते आता पाय बरा झाला आहे असा आहे बाबांच्या उदीचा महिमा.

श्रद्धा आणि सबुरी यामुळेच मी बरी झाले.

अशीच बाबांची कृपा आम्हां सर्व भक्तांवर राहो विसर न पडो ही साई-माऊलीस प्रार्थना.

★

## साईनिकेतनमधील रामनवमी

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीच्या दादर येथील साईनिकेतन या कचेरीत रामनवमीचा सोहळा नेहमीप्रमाणे उत्साहाने साजरा करण्यात आला. सकाळी ९ वा. कार्यालय उघडण्यात येऊन बाबांची यथाविधी पुजा करण्यात आली. दुपारी १२ वा. आरती झाली त्यावेळी शेकडो स्त्री--पुरुष भक्त मंडळी मोठ्या संख्येने हजर होती. याचवेळी श्री विजय हजारे यांच्या श्रीसाई गीत दरबारच्या दुसऱ्या भागाचा संकल्प सोडण्यात आला. सायंकाळी ६ वाजेपर्यंत कचेरी उघडी ठेवण्यात आली होती. याकाळात शेकडो साईभक्तांनी येऊन श्रींचे दर्शन, पूजन करण्याचा व प्रसादाचा लाभ घेतला.

# बाबा हे सद्गुरु कसे व त्यांच्या उदीचा महिमा

–श्री. किरणकुमार मनोहर नाईक
बंगला नं. २२, जेधे नगर,
बिबवेवाडी, पुणे – ४११ ०३७.

० हा लेख वाचकांना प्रस्तुत करण्याचे निमित्त केवळ बाबांच्या उदीने दाखविलेल्या महीमेनेच. आज माझे वय ३३ वर्षाचे आहे व माझे वयाच्या २२ व्या वर्षापासून मी बाबांचा निस्सी:म भक्त आहे. जरी लहानपणापासून मी बाबांची पूजा करीत असलो तरी गेले तीन वर्षे बाबांवरील भक्ती फारच प्रगाढ होऊन बसली आहे व बाबांनी त्यांच्या महान कृपेने मागील तीन वर्षात माझे जीवनात जी क्रांती घडविली तिचे वर्णन करावे तेवढे थोडेच. कित्येक संकटाच्या वेळी तसेच संसाराच्या सर्व प्रकारच्या अडचणींबाबत प्रत्येक वेळी केवळ बाबाच आमच्या मदतीस धावून येतात.

बाबा तसे अंतर्यामी, लिंबाच्या झाडाखाली १२ वर्षे तपश्चर्या करून बाबांनी प्रगाढ अध्यात्मिक सामर्थ्य प्राप्त केले होते. अंतर्मुख जागृत झाले तर त्या मनाने केलेला संकल्प हा सत्यसंकल्प असतो व हेच बाबांच्या तपश्चर्येने त्यांना प्राप्त झाले होते. गुरुशिष्याच्या नात्यातील गुरु हा श्रेष्ठ समजून तो शिष्यास योग्य मार्गदर्शन करीत असतो. तसेच बाबा हे आपल्या सर्वांचे गुरु व त्यांच्यात असलेल्या ईश्वरी अंशाने त्यांना सद्गुरु संबोधिले जाते. तेव्हां सद्गुरु म्हणजे साक्षात् देवच. आपण सर्वांनी जर त्यांना सद्गुरु संबोधून शरण गेल्यास ते भक्तांच्या अडी-अडचणीस धावून येऊन भक्तांचे कल्याणच करतात. श्री. हेमाडपंत यांनी लिहून ठेवलेल्या श्री साईचरित्रात बाबांच्या हयातीतील गुरुभक्तीचे बरेच अनुभव आहेत.

तेव्हां वाचकहो केवळ बाबांची पूजा करताना अथवा शिर्डीस त्यांचे दर्शन घेण्यास जाताना केवळ बाबांपुढे आपली मनोकामना अथवा मनातील इच्छा सांगताना त्यांना शरण जाऊन सद्गुरु मानून त्यांची जर मनोभावे पूजा, सेवा, उपासना करीत राहिल्यास बाबांची त्या भक्तावर संपूर्णपणे नजर असते. त्या भक्ताच्या प्रत्येक कामात, अडीअडचणीत, संकटी बाबा हजर असतात. त्यांचा फोटो वा मूर्ती ठेवून रोज पूजा करावी.

तसेच उदीचा महीमा वर्णावा तेवढा थोडाच. बाबांनी पेटवून ठेवलेल्या धुनीतील द्वारकामाईतील उदी तर आज जगातील लाखो लोकांना "संजीवनी"च आहे. रोज स्नानानंतर नित्यनेमाने आम्ही घरातील सर्व उदी लावून पुढचा कार्यभाग चालू करतो. एके दिवशी रात्रौ मला अशक्तपणाने फारच घेरले उजवा पाय हा जवळजवळ बधीर झाल्यासारखा झाला व रात्री १२ चे सुमारास सर्वांग घामाने घेरून जवळजवळ बेशुद्ध अवस्था शरीराने धारण केली. तात्काळ उदी कपाळास लावून बाबांचा धावा केला व जर आराम पडल्यास हा अनुभव "श्री साईलीला" मासिकात अवश्य देईन असे बाबांस म्हटले, तात्काळ हळूहळू आराम पडू लागला व पूर्वस्थिती येऊन शांत झोप लागली. धन्य ती द्वारकामाई व बाबांची धुनी व उदी!


**मुंबापुरीहून प्रसिद्ध होणाऱ्या मासिकात**
**प्रसिद्ध होणारे सर्वाधिक खपाचे मासिक**

**० श्रीसाईलीला ०**

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे अधिकृत मासिक
श्रीबाबांच्यावरील अनेक लेख
श्रीबाबांचे विविध अनुभव
श्रीबाबांशी संबंधित अनेक भावपूर्ण कविता
वर्षातून चार खास अंक – मनोहारी मुखपृष्ठे
वार्षिक वर्गणी अवघी १० रु. पृष्ठे ६४.

संपादक – श्री. क. हि. काकरे कोर्ट रिसिव्हर श्री साईबाबा संस्थान शिरडी.
कार्यकारी संपादक – श्री. सदानंद चेंदवणकर, (मराठी आवृत्ती)
डॉ. श्री. दि. परचुरे (इंग्रजी आवृत्ती)

# साईंची कृपा

–प्रतिभा शर्मा
८, जनार्दन, सेनापती बापट
मार्ग, दादर, मुंबई २८.

० श्री साईबाबांच्या लीलेचे अनेक अनुभव पदोपदी लोकांना येतच असतात. पूर्ण विश्वासयुक्त श्रद्धेने मागितलेले काहीही बाबा भक्तांना देतातच हे १०० टक्के सत्य आहे. श्रीसाईबाबांच्या पावन धुनीतील उदी हे पृथ्वीतलावरील 'अमृत'च आहे.

कोणताही अनुभव हा ज्याचा त्यानेच घ्यावयाचा असतो. तथापि साईबाबांना कबल केल्याप्रमाणे आम्हांला आलेला अनुभव साईलीला मासिकाला व त्याकरवी अनंत साईभक्तांपर्यंत पोचवत आहोत.

माझ्या मोठ्या बहिणीच्या डाव्या डोळ्याच्या पापणीवर एक फोड आला, डोळा सुजून झाकलाच गेला. डॉक्टरांनी सांगितले, की बरेच दिवस डोळा बरा होण्यास लागतील हे ऐकून माझी बहिण फारच उदासिन झाली. त्यातून मुक्त होण्यास एकच सहारा आमच्या हातात होता आणि तो म्हणजे बाबांचा . . . !

पूर्ण श्रद्धेने आम्ही सर्वांनी बाबांचा धावा केला व उदी सेवन व उदी लेपन सतत चालू ठेवले. जगात काही गोष्टी आपल्या बुद्धीच्या आकलनाबाहेरच्या असतात व साईबाबांच्या लीला तर अतर्क्यच आहेत! कोणत्याहि चांगल्या हेतूने कोणासाठीही केलेल्या प्रार्थनेला बाबांचा पाठिंबा हा असतोच. त्याप्रमाणे लवकरच डोळ्याला आराम पडू लागला व डोळा बरा झाल्याची चिन्हे दिसू लागली.

खरेच, बाबांनी लोकांना दिलेला शब्द आजही ते खरा करत आहेत. भक्तांना वाचवण्यासाठी त्यांची सारी संकटे स्वतः दूर करत आहेत. साईबाबांचे जितके श्रद्धायुक्त आभार मानावेत तितके थोडेच!

श्रीसाईबाबांना सर्वांतर्फे श्रद्धायुक्त अनंत आभार!!

साईंची ही कृपा "अनंत हस्ते कमलाकराने" त्यांच्या प्रेमळ भक्तांवर अशीच उधळत राहो हीच साईचरणी नम्र भावनेने केलेली प्रार्थना . . .

# धन्वतरी साईबाबांची अमृतवल्ली उदी

—श्री. ग. स. परब
३, शांति हा. सोसायटी, मोगललेन
माहिम, मुंबई ४०० ०१६.

० माझे सहचारी श्री. हळदणकर यांच्या २१।२२ वर्षांच्या एकुलत्या एक मुलाला फिटस् येऊ लागल्यामुळे त्याला के. ई. एम्. हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले व औषधोपचारा बरोबरच एक्सरे तपासणी झाली, त्यात त्याच्या मेंदूला टयुमर झाल्याचे दिसून आले व ते डॉक्टरांच्या मते ऑपरेशनने काढण्याचे ठरले, तेव्हां श्री. हळदणकर फारच चिंताक्रांत झाले. एक दिवस त्यांना दुःखी असण्याचे कारण विचारले असता त्यांनी वरील हकीगत सांगितली. तेव्हां त्यांना आमच्या अवलिया बाबांच्या लीलांबद्दल सांगून त्यांच्या उदीचा उपयोग करण्यास सांगीतला त्यांना शिर्डीची उदी दिली व ती पाण्याबरोबर पोटात घेण्यास व डोकीस चोळण्यास सांगून बाबांवर सर्व सोपवा व निर्धास्त रहाण्यास सांगितले. त्यांनीही ते मनापासून मानले व उदीचा उपयोग सुरू केला. ऑपरेशनच्या आदल्या दिवशी पुनः त्यास नायर हॉस्पिटलमध्ये पुनः तपासणीस नेऊन बरोबर निर्णय घेण्याचे ठरले, व त्याचा एक्सरे घेण्यात आला. त्यात त्याच्या मेंदूला टयुमर ऐवजी फक्त डाग असल्याचे दिसून आले. व त्याचे ऑपरेशन रहित करण्याचे ठरून त्यास घरी पाठविण्यात आले हा डाग फक्त औषधाने बरे करण्याचे डॉक्टरनी ठरविले. हा कशाचा चमत्कार म्हणावा? श्रद्धेचा, उदीचा की बाबांच्या म्हणण्याप्रमाणे "मी माझीया भक्तांचा हांकेला । आहे उभा पाठीच ठाकला!" या त्यांच्या लीलेचा? काहीच बोध होत नाहीं. पण हे सत्य प्रत्यक्षात अनुभवास येते व बुद्धिची झेप खुंटते. तेव्हां असे म्हणावेसे वाटते की त्या जादूगार साई बाबांस शतशः प्रणाम व त्यांच्या अमृतवल्ली उदीचा सर्व भक्तांस चमत्कार येवो. हीच त्या माऊलीपाशी प्रार्थना.

**साईचे द्वारी उभा क्षणभरी ।**
**चिंता दूर करी भक्तांचिया ।**
**सर्वांभूतां ठायीं असे ज्याचा वास ।**
**अनन्यभावे शरण नित्य जाई त्यास ।।**

सद्‌गुरु साईबाबांस त्रिवार प्रणाम. ꣸ ꣸

# उदीचा चमत्कार

—श्रीमती अनुसूया खुबालकर
द्वारा श्री साईभवन टिकरापारा,
रामदास नगर, बिलासपूर म. प्र.

० माझे पति स्व. श्री. पी. टी. खुबालकर हे साईबाबांचे अनन्य भक्त होते. ते बिलासपूर येथील दक्षिण पूर्व रेल्वे इंग्लिश मिडियम हायस्कूलमध्ये शिक्षक होते. त्यांना रेल्वेतर्फे पास मिळत असे. ते हयात असतांना बहुतेक शिरडीला साईबाबांच्या दर्शनाला प्रतिवर्षी जात असत. परंतु २१ एप्रिल १९७८ ला साई-बाबांनी त्यांना नेहमी करताच आपल्याजवळ बोलावून घेतले. त्यांनीच आमच्या घराचे 'साईभवन' हे नाव ठेवले.

श्री साईबाबांची आमच्यावर कृपादृष्टी आहेच परंतु त्यांचे बरेच अनुभव पण आम्हांस येतात त्यातील एक ताजा अनुभव मी पुढे देत आहे.

आमच्या साईभवनात एक कुत्री आहे. तिला तीन पिले झाली. पिले जवळ जवळ १ वर्षाची झालीत आणि ती कुत्री एवढीच मोठी दिसायला लागली होती. अचानक एका पिल्लाच्या गळ्याला सूज आली आणि त्याने खाणे पिणे सोडून दिले. आम्ही त्याला खाऊ घालण्याचा बराच प्रयत्न केला. परंतु कोणत्याही प्रकारे ते काहींच खाईना च शेवटी ७।८ दिवसानंतर त्याच्या गळ्याची सूज जास्त होऊन ते मरण पावले. नंतर २।३ दिवस होतात न होतात तर दुसरे पिलू पण त्याच प्रकारे आजारी झाले आणि मेले. ४।५ दिवसांनी तिसरे पिलू पण गळा सुजून मरण पावले. याप्रमाणे तीनही पिले गळ्याच्या रोगाने मरण पावली.

ही कुत्री म्हणजे बाहेर फिरणाऱ्या कुत्र्यांपैकीच एक आहे. तिला आम्ही पाळलेली नाही. परंतु आमच्या साईभवनात ४।५ भाडेकरी राहतात व कोणी ना कोणी तिला उरलेले अन्न किंवा खरकटे देत असतात आणि त्यामुळे ती जास्तीत जास्त वेळ आमच्याकडेच बसलेली असते. या कुत्रीच्या ३ पिढ्या आमच्या कडे झाल्या. एकदा एका भाडेकरूने सहजच ही कुत्री लहान असतांना तिला पांड्या नाव दिले, आणि पुढे तिचे पांड्या हेच नाव पडले. तिचीच ही तीन

पिल गळ्याच्या रोगाने मरण पावली. पांड्याही आमच्या साईभवनाची रखवाली करीत असते. तिच्यामुळे आम्हांला चोरांचेसुद्धा भय नाहीं.

एके दिवशी अचानक पांड्यांच्या गळ्याला पण सूज आली. गळा सुजू लागला पांड्याचे खाणे पिणे बंद झाले. ती गळत चालली. आम्हांला वाटलं आता ही पांड्यासुद्धा मरणार हे नक्कीच. तिला पांड्या म्हणून आवाज दिल्यास ती नुसती शेपटी हालवायची आणि डोळे बंद करून रहायची. तशी ही पांड्या फारच चपळ कुत्री आहे. आणि पूर्ण मोहल्ला तिलां पांड्या ह्या नावानी ओळखतो. तिची ही दशा पाहून आम्हां सर्वांना फारच वाईट वाटत होते. काय करावे काहीं सुचेना. अचानक मला बाबांच्या उदीची आठवण झाली आणि मी लगेच थोडी उदी घेऊन बाबांना नमस्कार केला आणि म्हटले बाबा ही उदीच आता पांड्याची संजीवनी आहे. मी ती उदी दुधात घालून एकेक थेंब करून ५।६ चमचे दुधातून ती उदी तिच्या पोटात घातली आणि काय आश्चर्य १० मिनिटांत पांड्यानी हालचाल सुरू केली डोळे उघडण्याचा ती प्रयत्न करू लागली आम्हां सर्वांना आनंद झाला. नंतर १५ मिनिटांनी थोडे दूध व त्यात थोडे पोहे उदी घालून जबरदस्तीने तिच्या दाताच्या फटीतून घालून घालून खाऊ घातले. दुसरे दिवशी सकाळी जाऊन पाहतो तो काय आश्चर्य पांड्या उभे होण्याचा प्रयत्न करीत होती आणि तिच्या गळ्याची सूज पण गायब झाली होती.

यानंतर तिसरे दिवशी पांड्या पूर्णपणे स्वस्थ होऊन बाहेर निघाली, आणि पूर्वीप्रमाणेच पूर्ण मोहल्यात ती आता फिरत आहे.

बाबांची लीला अगाध आहे. त्यांची अंतःकरणापासून प्रार्थना केली तर ते आपल्या भक्तांचे मनोगत पूर्ण करतात तुम्ही कुठेही कितीही दूर असाल तरी ते आपल्या भक्तांकरिता धावून येतात.

# साईलीला वडिलांस पुनर्जन्म

—श्री. भिकाजी जनार्दन महाडिक
श्री साईकृपा क्लॉथ सेंटर.
महर्षि कर्वे मंडई, चिपळूण,
जि. रत्नागिरी.

० मी एका मिलमध्ये एक मामुली कामगार होतो. मी बाबांची भक्ती करु लागलो अन् चमत्कार घडू लागला. स्वत: प्रयत्न न करता मला नोकरीत बढती मिळाली. मी सुपरवायझर झालो. ही सारी साईंची कृपा! श्रद्धा आणि भक्ती ह्याची ओढ मनास लागली. शिर्डी येथे वेळोवेळी जाऊ लागलो.

माझ्या गावी संगमेश्वर–मुचरी येथे श्री दत्त मंदिराची स्थापना करावी ह्या इच्छेने जोर धरला. ही इच्छापूर्ती होताना खूप अडचणी आल्या. परंतु बाबांच्या कृपेने साऱ्या अडचणींवर मात करून इच्छिल्याप्रमाणे मंदीराची स्थापना झाली.

सध्या मी चिपळूण बाजारपेठेत एक प्रसिद्ध कापड व्यापारी आहे. हा साईंच्या कृपेचा प्रसादच! मीलमध्ये नोकरी करणारा मी व्यापारी होणे अशक्य होते. भांडवल नसतानाही दुकान खरीदणे किंवा त्यासाठी लागणारा माल खरेदी करणे फक्त माझ्या भक्तीचे सामर्थ्य आहे. थोर व्यक्ती माझ्या पाठीशी पाठवून बाबांनी तेही काम पूर्ण केले.

माझ्या मुलीचे लग्नही श्री साईबाबांच्या कृपेनेच झाले. माझ्या मनासारखा मुलीला वर मिळाला. अशा कौटुंबिक जबाबदारीतून निर्विघ्नपणे पार पाडणाऱ्या साईबाबांची महती किती वर्णावी?

माझ्या वडिलांना मिळालेला पुनर्जन्म हा असा ... गोकुळअष्टमीच्या आदल्या दिवशी म्हणजे सप्तमीला गावाहून एक गृहस्थ माझे वडील आजारी असल्याचा तातडीचा निरोप घेऊन आले. दहीहंडी बांधण्यासाठी सर्व साहित्य आणले होते. अष्टमीला गावी जाणारच होतो. परंतु ९० वर्षे वय झालेल्या वडिलांची ही बातमी ऐकून मी आशाच सोडली. घरी पोहचताच वातावरण

खूपच गंभीर झाले, मी, माझी पत्नी, लहान भाऊ अनेक प्रयत्न करीत होतो. त्यांना दूध पाजत होतो, पाणी पाजत होतो. परंतु सर्व प्रयत्न निष्फळ होते. अचानक बाबांचे नाव ओठी आले. अखंड नामस्मरण सुरू झाले. ही स्वयंस्फूर्ती भक्ती हाच तरणोपाय ठरला. मनातच म्हटले, "बाबा, आता तुम्हीच काय ते सांभाळा", बाबांची विभूती (उदी) पाण्यातून पाजली. मस्तकी लावली आणि चमत्कार घडला ...त्यांची तब्येत हळूहळू सुधारली! आता माझे वडील व्यवस्थित अन्न प्राशन करतात, हिंडू-फिरू शकतात श्री साईबाबांच्या विभूतीने, नामस्मरणाने हा बिकट प्रसंग टळला आणि वडिलांस पुनर्जन्म मिळाला.

आजही वरील प्रसंग आठवला की सद्गुरु साईबाबांच्या '**जो जो मज भजे, जैसा जैसा भावे । तैसा तैसा पावे मीही त्यासी ।।**" या वचनाची आठवण होते.

श्री साईमाऊली सर्व साईभक्तांच्या हाकेला धावो हीच साईचरणी प्रार्थना!

# बंद घड्याळ चांगले चालू लागले

—सौ. अनिता आत्माराम आजगावकर
मु. पो. शिरगांव, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग

• मी पहिल्यापासून गणेशभक्त. गणेशाची कृपादृष्टी माझ्यावर कायम आहे. एके दिवशी मी आमच्या गावांतील सौ. बापट यांच्या घरी गेले. त्यांनी मला साईबाबांची भक्ति करा, आपली सर्व संकटे दूर होतील असा सल्ला दिला. साईच्या उदीचा चमत्कार सांगितला. त्याचे प्रत्येतर मला ताबडतोब अनुभवास आले व मी साईभक्त बनले.

आमच्या घरामध्ये आम्ही पुण्याहून एक मोठे भिंतीवरील घड्याळ आणले. घड्याळ श्री साईच्या फोटोसमोर ठेवून आम्ही चांगले चालण्यासाठी गाऱ्हाणे घातले. घड्याळ १ महिना चांगले चालले सुद्धा परंतु नंतर घड्याळ एकाएकी बंद झाले. चावी दिली. परंतु घड्याळ काहीं चालेना. आम्ही सर्वजण अत्यंत निराश झालो. अत्यंत कष्टाने आणलेले घड्याळ बंद पडलेले पाहून आम्हांला फार वाईट वाटले. अचानक मला बाबांच्या उदीची आठवण झाली. मी बाबांची उदी घेतली व ती संपूर्ण घड्याळालाच लावली व मनात गाऱ्हाणे घातले की बाबा तुमची उदी घड्याळाला लावली आहे. आता पुढचा चमत्कार तुमचा आणि काय आश्चर्य! घडयाळ पुन्हा व्यवस्थित चालू लागले.

अशा प्रकारे साईची आमच्यावर आईसारखी कृपादृष्टी आहे.

श्री साईबाबांना माझ्या कुटुंबाचे कोटी कोटी प्रणाम!

# साईकृपने आजारातून मुक्त

-कु. संजय पुंडलिक कुंभार (यमगर्णीकर)
७४७ डी वॉर्ड शाहू उद्यान रोड,
कुंभार गल्ली, कोल्हापूर.

० मी जेव्हा सातवीत होतो तेव्हाची गोष्ट. शाळा सुरू झाली आणि मला थोडाफार आजार झाला. त्याचवेळी माझ्या वडिलांच्या ऑफिसमध्ये एक कुलकर्णी नावाचे गृहस्थ होते. त्यांची श्री बाबांचेवर खूप भक्ती होती. त्यावेळी त्यांनी आम्हाला श्री बाबांचे सर्व अनुभव सांगितले तेव्हापासून आम्ही सर्वांनी श्री बाबांची भक्ति सुरू केली.

शाळा सुरू झाली आणि एक महिन्यानंतर मी आजारी पडलो. माझा ताप कधी कमी तर कधी जास्त होऊ लागला. त्यातूनच मी बाबांची उदी पाण्यातून घेवू लागलो तरीपण माझा आजार काही बरा होईना. शेवटी आमच्या ओळखीच्या श्री बाबांचेवर भक्ती असलेल्या कुलकर्णी काकू माझ्याकडे येवून मला दररोज उदी आपल्या हातात घेवून बाबांचे नामस्मरण करून खावयास देत. पण काही केल्या माझा ताप कमी होईना. शेवटी मला दवाखान्यात नेण्यात आले. तेव्हां आमच्या घरातील सर्वांना वाटू लागले की संजू गेला तेव्हा माझा ताप १०३ वर गेलेला होता. थर्मामीटर पाहिल्या नंतर डॉक्टरसुद्धा दचकले परंतु इलाज नव्हता. जवळ जवळ एक महिना होत आला तरी पण माझा ताप काहीं कमी होईना, घरातील सर्वांना भिती वाटू लागली. माझ्या तापाची वेळ म्हणजे दुपारी बारा वाजता ताप चढायचा आणि थोड्या वेळाने कमी व्हायचा, आणि परत रात्री बारा वाजता सुद्धा असाच ताप भरायचा तेव्हा घरातील सर्व मंडळी भयग्रस्त व्हायचे. घरातील सर्व मंडळी डोळ्यात तेल घालून बसल्यासारखे रात्रभर बसायचे तरी पण माझा आजार काहीं कमी होईना. जवळ जवळ तीन महिने झाले माझा आजार थोडा कमी झाला. शेवटी मला दवाखान्यातून घरी आणले गेले. तेव्हां माझी सातवीची शाळा बुडालेली होती. त्यातूनच मला काळजी वाटू लागली की मी सातवी पास कसा होईन. त्यातूनच मी अभ्यास करावयाचा असे ठरविले.

जेव्हां मला दवाखान्यातून घरी आणले तेव्हा माझा आजार थोडा कमी झाला होता. तेव्हा सर्वांना आनंद वाटू लागला तरीपण आमच्या साईभक्त असलेल्या

कुलकर्णी काकू मला दररोज श्री बाबांची उदी पाण्यातून देवू लागल्या त्यातूनच त्यांनी श्री बाबांना विनंती केली की या मुलाला आजारातून मुक्त करा तेव्हा मी तुमचे पारायण करीन असे म्हटले होते. तेव्हा पासून माझा आजार कमी झाला व मी खडखडीत बरा झालो. मला बरे वाटल्यानंतर कुलकर्णी, काकूनी लगेच श्री बाबांचे पारायण केले. तेव्हांपासून आम्ही सर्वजण श्री बाबाची खूप खूप भक्ती करू लागलो, आणि बाबांच्या आशिर्वादाने चांगल्या मार्कांने पासही झालो.

अशी ही बाबांची करणी आणि अद्‌भूत शक्ती पाहून मला खूप आश्चर्य वाटते आणि आनंदही वाटतो.

---

# उदीचा चमत्कार

—श्रीमती सुमित्रा म. पाटणकर
३४।९०३ नेहरू नगर,
कुर्ला (पूर्व), मुंबई ४०० ०२४.

० परमेश्वरावर विश्वास ठेवला तर आपले कोणतेही कठीण काम झाल्याशिवाय रहात नाहीं. त्यातूनही आपण सहीसलामत सुटतो. मात्र विश्वास (श्रद्धा) ठेवायला हवा. कोणतेही काम लगेच म्हटल्या बरोबर होत नाहीं. तूप खाल्ल्याबरोबर रूप येत नाहीं त्यासाठी धीर (सबुरी) धरावा लागतो. श्री साईबाबांनी आपल्याला ह्याच दोन गोष्टींची शिकवण दिली आहे. मला आता ह्या कलियुगात सुद्धा आलेला ताजा अनुभव मी तुम्हांला सांगणार आहे. ह्यात अतिशयोक्ती मुळीच नाहीं.

माझे दोन्ही पाय नेहमीच दुखतात. पण मी त्याकडे दुर्लक्ष केले. कारण ते नेहमीच दुखत असतात. पण एप्रिल १९८३ ची गोष्ट माझा एक हात व एक पाय (उजवी बाजू) एकदम दुखायला लागले. दुखायचे म्हणजे इतके वळायचे की मला चैन पडत नसे. म्हणून मी डॉक्टरांच्याकडे गेले. तर त्यांनी गोळ्या दिल्या पण त्या गोळ्यांचा परीणाम असा झाला की, त्या सतत घेतल्याने अंगाला सूज येते. मला भिती अशी वाटत होती की एक बाजू दुखते म्हणजे (अर्धांगवायू) होणार. म्हणून लगेच मी डॉक्टरांचा आधार घेतला पण सूज येईल असे कळल्या-

वर मी तो नाद सोडून दिला. आणि घरातल्या बाबांच्या (साईंच्या) फोटोजवळ उभे राहून म्हणाले की "मी यापुढे मुळीच डॉक्टरांच्याकडे जाणार नाहीं. मी तुमची उदी लावणार आहे आणि मी त्या दिवसापासून पायाला, हाताला व बोटांना रोज रात्री झोपताना उदी लावू लागले, सकाळी उठल्यावर मला इतके बरे वाटू लागले की माझे हात व पाय दुखत होते हे माझेच मला खरे वाटेना. मात्र दोन दिवसांनी पुन्हां दुखायला लागले. कदाचित बाबा माझी परीक्षा घेण्यासाठी हे करत असावे, की "पाहू या डॉक्टरकडे जाते का?" पण मी पुन्हां त्यांच्या समोर उभे राहून निक्षून सांगितले की मी मुळीच डॉक्टरांच्याकडे जाणार नाहीं मी सतत उदी लावत रहाणार आणि अशी ९ दिवस मी पुन्हां उदी लावली आणि त्या उदीचा चमत्कार मला खरोखरच असा दिसून आला की माझा हात व पाय बरा झाला. कारण त्या हाताने मला रोज सतत लिहायचे असते तरीही मला त्या हाताचा आता त्रास होत नाहीं. खरोखरच उदीने माझा पाय व हात बरा झाला. बाबा पूर्वी दुःखित–पीडीतांना, रोग्यांना उदी हेच औषध देत होते. आणि हे त्यांचे मौल्यवान औषध किती गुणकारी आहे हे ह्या कलीयुगात सुद्धा स्वानुभवाने आपल्याला घेता येते.

# श्री. बाबांच्या उदीची सत्यता

–श्री सत्यवान गायकवाड
३१९, नवी खडकी, येरवडा,
पुणे – ४११ ००६.

**"झालो जरी मी गतप्राण । वाक्य माना माझे प्रमाण ।।**
**डोळ्याआड होईन हीं चिंता । करू नका तुम्ही मजकरितां ।।**
**मात्र माझे करा स्मरण । विश्वासयुक्त अंतःकरण ।।"**

० या बाबांच्या वचनांची प्रचिती येते.

श्री साईनाथ महाराजांनी आपल्या पवित्र अखंड जळणाऱ्या धुनीतून लाखो लोकांचे रोग बरे केले आहेत. आणि आज सुद्धा रोग बरे होतात. जर या पृथ्वीवर बाबांसारखा महान संत अवतार घेऊन आला नसता तर मी केव्हांच मेलो असतो.

मी सन १९८० मध्ये अशक्तपणाने बेजार झालो होतो. मला काहींवेळा असे वाटावयाचे की मी उद्या सकाळी जगणार नाहीं. मला सतत चक्कर यावयाची व मी केव्हांही बेशुद्ध पडावयाचो. परंतु बाबांनी आपल्या भक्तांना सांगितलेच आहे कि मला तुमच्या बहात्तर पिढ्यांची ओळख आहे. त्याच प्रमाणे बाबांनी

या पिढीतच मला त्यांच्या चरणापाशी ओढून घेतले व भक्तिमार्गाला लावले. मला साईबाबा किंवा शिरडी याबद्दल काहींच माहित नव्हते. बाबांच्या प्रेरणेने मी १९८० च्या ८ फेब्रुवारीस शिरडीला गेलो. बाबांच्या समाधिचे दर्शन घेताच गहिंवरून आले मनाला आनंद झाला व माझ्या आयुष्यात एवढा आनंद झाला नव्हता तो यावेळी झाला. शिरडीवरून येताच बाबांची उदी मी घेऊनच आलो होतो. मी सकाळ संध्याकाळ कपाळाला लावू लागलो व पाण्यातून पिऊ लागलो. नाना प्रकारे औषधोपचार केले परंतु सर्व काहीं व्यर्थ अवघ्या १ महिन्यात बाबांनी मला ठणठणीत बरे केले. तेव्हांपासून मी साईबाबा प्रत्यक्षात साक्षात देवच आहेत अशी माझ्या मनाची खात्री झाली. मला महाराजांच्या नाम स्मरणाची गोडी लागली आणि माझ्या जीवनात एक अलौकिक गोड मरेपर्यंत असा अमूल्य भक्तिचा ठेवा बाबांनी दिला. मी असे समजतो कि जर मला बाबांनी जीवदान दिलय मग आता मरायचेच तर बाबांचे नामस्मरण करून बाबांची भक्ती करून, बाबांची महिमा गाऊन. माझा आजार एक निमित्त आहे. असे माझे ठाम मत झाले आहे.

शिरडीच्या परमेश्वराची आम्हां सर्व कुटुंबियांवर महा उपकार आहेत. हे उपकार कोणत्याही जन्मात आमच्या होतून फिटणार नाहींत. अशा या देवास माझे दोन हात जोडून व मस्तक झुकवून कोटी कोटी प्रणाम.

# उदीमुळे सूज उतरली

—मृदुला आंब्रे.
'शकुंत', के. जी. सोसायटी रोड,
जोगेश्वरी, मुंबई ४०० ०६०.

० माझ्या वडिलांना मधून मधून रक्तदाबाचा त्रास होत असतो. असेच एकदा त्यांच्या डाव्या पायास सूज आली. ती इतकी की त्यांना जमिनीवर पाय टेकवेना. २ दिवस तसेच काढले. नंतर डॉ. च्या गोळ्या सुरू केल्या. पण रोज एवढं फिरण्याशिवाय चैन न पडणारे माझे वडील नुसतं चालणंही शक्य होईना म्हटल्यावर खूपच त्रासले. आणि आम्हांलाही ते पहावेना. शेवटी त्यांना नित्य-विधींसाठी भांडे आणावयास लागते की काय अशी भिती वाटली. तेव्हां एका संध्याकाळी माझ्या मनांत काय आले कुणास ठाऊक, मी एकदम त्यांना म्हटले

की, ही उदी घ्या पाण्यात घालून आणि झोपा. उद्या सकाळी तुम्ही स्वतः उठून बाथरूममध्ये गेलातच पाहिजे. आणि खरोखर माझे वडील सकाळी स्वतः चालत बाथरूममध्ये गेले.

दुसरे असे, एकदा कानात पीन घातल्यामुळे कान दुखायला लागला. बहुधा पीन आत लागली असावी. त्याआधी अशाच कारणासाठी डॉ. कडे माझे १५० रु.खर्च झाले होते. त्यामुळे पुन्हां भीति वाटु लागली. आईही दुसरीकडे रहावयास गेलेली त्यामुळे काय करावे सुचेना. ३।४ दिवस असेच गेले. एके रात्री बाबांना म्हटले माझा कान घरचेघरी बरा होऊ दे मी हा अनुभव साईलीलेत देईन. नेमकी आई त्या दिवशी घरी आली तिने साधे खोबरेल गरम करून कानात घालण्यास रोज सुरुवात केली. आणि ३।४ दिवसांत कान पूर्ण बरा झाला.

नंतर असेच एकदा आईच्या उजव्या डोळ्याचे मोतिबिंदूचे ऑपरेशन झाले होते. त्यानंतर बरेच दिवसांनी घरातला लाकडी पलंग सरकविण्याचा प्रसंग आला. त्याला आईनेही हातभार लावला. दुसरे दिवशी उजव्या डोळ्याला कसेतरी वाटू लागले. मी घाबरले. व बाबांना प्रार्थना केली की डोळ्याला कुठेही काहीही न् होऊ दे मी हा अनुभव साईलीलेत देईन. दुसऱ्या दिवशी डॉ. कडे नेले तेव्हां काहीही नसल्याचे डॉ. नी सांगितले.

ही सारी श्री बाबांचीच कृपा.

❋ ❋ ❋

# उदीचा प्रभाव

—सौ. रत्ना विलास पवार
१९५, यादोगोपाळ पेठ, सातारा.

० साईबाबांची 'उदी' किती प्रभावी आहे याचा अनुभव प्रत्येक साईभक्तास नेहमीच येत असतो. बाबांची उदी म्हणजे खरोखरच या पृथ्वीतलावरील संजीवनीच होय याचा प्रत्यय मलाही एकदा असाच आला, तो असा —

एकदा सकाळी ११ वा. मी माझ्या मुलीस शाळेतून घरी घेऊन येत होते. एवढ्यात मला रस्त्यामध्ये अत्यंत दिनवाणे असे विव्हळत आडवे पडलेले एक कुत्रे दिसले. त्याच्या मानेच्या खालच्या बाजूस एक मोठी जखम झाली होती

त्याची अत्यंत दीनवाणी अवस्था पाहून प्रत्येकजण हळहळत होता, त्याची ती मरणासन्न अवस्था कुणालाही पहावत नव्हती तसेच माझेही झाले. आमच्या दोघींच्याही मुखामधून 'आईग' असा सहानुभूती युक्त उद्‌गार बाहेर पडला. मी त्याच्यापासून २।४ पावले पुढे गेले होते एवढ्यात आठवण झाली. माझ्याजवळ उदी आहे याची. मी माझ्या जवळची ती उदी घेतली आणि बाबांचे नाव घेऊन हळूच त्या कुत्र्याच्या अंगावरती त्याची चिमूट सोडली. आणि काय आश्चर्य? अत्यंत दयनीय अवस्था असलेले ते कुत्रे अवघ्या एका क्षणातच पळत सुटले. माझ्या मुलीसही आश्चर्य वाटले तो म्हणाली आई तू काय केलेस तेव्हां मी तिला म्हटले अग, त्याला मी उदी लावली.

खरोखरच किती परम दयाळू अंतःकरणाची आहे ही आपली सद्‌गुरु साई-माऊली! त्या सद्‌गुरु साई–माऊलीस माझे कोटी कोटी प्रणाम!

# बाबांच्या उदीने गाठी बऱ्या

–सौ. ज्योती प्रदीप जोशी
आनंदनगर, प्लॉट नं. ८७,
मु. पो. तळेगाव (स्टेशन),
जिल्हा – पुणे

• 'साईबाबा म्हणजे जणू कल्पवृक्षाचे झाडच'

माझ्या आईची व भावाची साईबाबांवर फार श्रद्धा, ह्यामुळे माझ्याही मनात साईबाबांविषयी भक्ती उत्पन्न झाली. मला मुलगा झाल्यावर त्याला घेऊन दर्शनाला येईन असे आई म्हणाली आणि १। वर्षातच मला मुलगा झाला. माझी श्रद्धा आणखीनच वाढली.

मी बाळंतीण असताना माझ्या छातीवर दोन टणक गाठी आल्या. डॉक्टरनी तपासले व म्हणाले ३ दिवस वाट पाहून ऑपरेशन करावे लागेल का ते ठरवू. हे ऐकून मी घाबरून गेले. औषधाबरोबर रोज बाबांची उदी घेऊ लागले व रोज त्यांच्या पुढे उदबत्ती लावू लागले. ३ रे दिवशी गाठी खूप कमी झाल्या व पुढे नाहीशा झाल्या. माझ्या बाळाला कोणतेही दुखणे झाले तरी बाबांचा अंगारा लावते त्यामुळे बाळाला लवकर बरे वाटते.

मी पोस्टात नोकरी करते. कायम झाले नव्हते तेव्हां रजेच्या बाबतीत फार अडचण येत असे. आई मला सारखे म्हणायची, 'अग बाळाला घेऊन केव्हां शिर्डीला जावयाचे?" 'जाऊ लवकरच' असे मी म्हणे. एक दिवस मी नोकरीला चालले असताना माझ्या मनात आले की शिरडीला रजा घेऊन निवांतपणे जावयाचे आहे. पण ३ वर्षे झाली तरी अजून कायम झाल्याची ऑर्डर येत नाहीं. ती आली की शिरडीस जाऊ. आणि काय आश्चर्य. मी पोस्टात पोहचताच माझे सहकारी म्हणाले, 'ताई पेढे काढा, तुमची याच पोस्टात कायम झाल्याची ऑर्डर आली आहे.' "शरण मज आला आणि वाया गेला, दाखवा दाखवा मजला ऐसा कोणी' या साईवचनाची मला तात्काळ आठवण झाली. जय साईनाथ.

## अखिल भारतीय साईभक्त
### लेखक-कवी संमेलन, नवापूर

अखिल भारतीय लेखक-कवींचें पहिले स्नेहसंमेलन शनिवार ता. १२ मे व रविवार ता. १३ मे ८४ रोजी सार्वजनिक हायस्कूल, जयहिंद छात्रालय स्टेशन रोड, नवापूर जि. धुळे ४२५४१८ येथे भरविण्यात येत आहे. याप्रसंगी मा. श्री. वसंतराव पिंगळे चेअरमन श्री. संतनरहरी एज्यूकेशन ट्रस्ट धुळे हे अध्यक्ष असून उद्घाटक श्री. अ. धा. वसावे आय. ए. एस. मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. धुळे हे आहेत. मुख्य पाहुणे म्हणून श्री. क. हि. काकरे कोर्टरिसिव्हर श्री. साईबाबा संस्थान शिरडी, प्रख्यात पार्श्वगायक श्री. जयवंत कुलकर्णी, सदानंद चेंदवणकर का. संपादक श्रीसाईलीला, नवापूरचें उद्योगपती श्री बिपिन भाई चोखावाला, खानदेश टाईम्सचे संपादक श्री. वाल्मिक दामोदर डॉ. डी. के. सोनार, अनिलभाई शहा व जळगाव आकाशवाणी केंद्राचे श्री. भैयासाहेब उपासनी इ. नामवंत मंडळी आहेत. या संमेलनास हजर राहू रहाणाऱ्यांनी श्री. रमेश डी. चव्हाण, साईनिकेतन, गुजरलेन. नवापूर जि. धुळे येथे त्वरित संपर्क करावा.

**नम्र सूचना :** या अंकासाठी आलेले आणखीन काही चांगले लेख अनुभव व कविता मजकुराच्या गर्दीमुळे या अंकात जाऊ शकले नाहीत. हे सारे साहित्य श्रीसाईलीला जून ८४ अंकात प्रसिध्द केले जाईल.

**—कार्यकारी संपादक**

# साईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | श्री साईचरित्र | मराठी | २२–०० | ६–०० |
| २) | ,, | इंग्रजी | १३–५० | ४–०० |
| ३) | ,, | हिंदी | १२–०० | ४–०० |
| ४) | ,, | गुजराथी | १२–०० | ४–०० |
| ५) | ,, | कन्नड | १०–०० | ४–०० |
| ६) | ,, | तेलगू | १३–०० | ४–०० |
| ७) | ,, | तामीळ | १२–०० | ४–६० |
| ८) | श्री साईलीलामृत | मराठी | ७–५० | ३–०० |
| ९) | ,, | हिंदी | ७–०० | ३–५० |
| १०) | ,, | गुजराथी | ४–२५ | ३–०० |
| ११) | अवतार व कार्य | मराठी | ४–०० | ३–०० |
| १२) | स्तवन मंजरी | मराठी | ०–३५ | ३–०० |
| १३) | ,, | गुजराथी | ०–३० | ३–०० |
| १४) | सगुणोपासना | मराठी | ०–५० | ३–०० |
| १५) | ,, | गुजराथी | ०–५० | ३–०० |
| १६) | तेलगू पुजाविधी | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| १७) | चार अध्याय | मराठी | १–२५ | ३–०० |
| १८) | श्रीसाईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | ५–०० | ३–०० |
| १९) | किर्तनमाला | मराठी | ०–७५ | ३–०० |
| २०) | सचित्र साईबाबा | मराठी | ४–०० | ३–०० |
| २१) | शिरडी दर्शन | इंग्रजी | ४–५० | ३–०० |
| २२) | मुलांचे साईबाबा | मराठी | १–७५ | ३–०० |
| २३) | ,, | इंग्रजी | १–७५ | ३–०० |
| २४) | ,, | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| २५) | ,, | गुजराथी | १–५० | ३–०० |
| २६) | ,, | हिंदी | १–७५ | ३–०० |

साईनाथ ग्रंथालय
साईबाबा संस्थान, शिर्डी

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence To Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

(कव्हर पृष्ठ ३ वरून)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७) | ग्रेट सेंट श्री साईबाबा | मराठी | ०–५० | ३–०० |
| २८) | श्री साईबाबा दि सुपरमॅन | इंग्रजी | ५–२५ | ३–०० |
| २९) | शिरडी गाईड | इंग्रजी | १–५० | ३–०० |
| ३०) | ,, | मराठी | १–५० | ३–०० |
| ३१) | शिरडी गाईड | गुजराथी | १–५० | ३–०० |
| ३२) | ,, | हिंदी | छपाई चालु | आहे. |
| ३३) | रुद्राध्याय | मराठी | ०–९० | ३–०० |

३४) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र मराठि व इंग्रजी वार्षिक वर्गणी १०–०० प्रत्येकी प्रत १–००

(व्ही. पी. ची पद्धत नाहीं)

| अ क्र. | फोटोचे नाव | फोटो साईज | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | आशिर्वाद फोटो | १४"×२०' | १–६५ | ३–०० |
| २) | ,, | १०"×१४' | १–१० | ३–०० |
| ३) | ,, | ७"×१०' | ०–५५ | ३–०० |
| ४) | ,, | ४"×५" | ०–२० | ३–०० |
| ५) | ,, | २"×३" | ०–१५ | ३–०० |
| ६) | दगडावर बसलेले बाबा (रंगीत) | १४"×२०" | १–६५ | ३–०० |
| ७) | ,, (काळा पांढरा) | १४"×२०" | १–६५ | ३–०० |
| ८) | मूर्ती फोटो | १३"×१८" | २–७५ | ३–०० |
| ९) | ,, | १३"×१८" | १–०० | ३–०० |
| १०) | द्वारकामाई कॅमेरा (रंगीत फोटो) | १०"×२०" | १–१० | ३–०० |
| ११) | ,, (काळा पांढरा) | १०'×१४" | ०–८५ | ३–०० |
| १२) | कॅमेरा द्वारकामाई फोटो , | ९'×१२' | १–१० | ३–०० |
| १३) | ,, (रंगीत) | ९"×१२' | १–६५ | ३–०० |
| १४) | निळा | ९×१३ | ०–७५ | ३–०० |
| १५) | श्रीसाईबाबांचे पठ्याचे कॅलेंडर | — — — | १६–०० | ८–०० |

मुद्रक : **पांडुरंग मोरे**, बॉम्बे नॅशनल प्रिन्टर्स प्रा. लि. ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ३१, संपादक व प्रकाशक : श्री. क. हि. काकरे, साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४, बी. दादर मुंबई १४.